श्रम अर्घ्य

■ ॲड. गो. का. आठवले ■

लेखक

- राष्ट्रीय स्वयंसेवक संघके बाल्यकालसे स्वयंसेवक ।
- नागपुरके विधिज्ञ तथा श्रम कानूनके विशेषज्ञ ।
- भारतीय मजदूर संघके पूर्व राष्ट्रीय मंत्री तथा पूर्व क्षेत्रीय मंत्री ।
- महाराष्ट्र विधान परिषद के पूर्वसदस्य ।
- अनेक यूनियनोंके संस्थापक / महामंत्री ।
- विश्वकर्मा श्रमिक शिक्षा संस्था के संस्थापक ।
- केंद्रिय श्रम शिक्षा मंडलमें भा. म. संघ के प्रतिनिधी तथा पूर्व उपाध्यक्ष ।

॥ श्रीः ॥

न ऋते श्रांतस्य सख्याय देवाः ।
(ऋग्वेद)

●

श्रम - अर्घ्य

(श्रमिक क्षेत्र संबधित लेखसंग्रह)

●

लेखक
ॲड. श्री. गो. का. आठवले

●

संकलक
प्रा. श्री. कृ. नवीनचंद्रन्

प्रकाशन तिथी

आषाढ शु. १९, शके १९१४

स्वदेशी उपग्रह प्रक्षेपणदिन

दिनांक १० जुलै १९९२

चित्रण तथा मुद्रण

श्री. आनंद गोविंद पुराणिक

संचालक

अक्षय मुद्रा

'अमृत', धरमपेठ, नागपूर-१०

(खाजगी वितरणासाठी)

वितरक

महासचिव

भारतीय मजदूर संघ

विदर्भ

अनुक्रमणिका

अनु. क्र.	लेखाचे शीर्षक	पृष्ठ क्र.
१.	**सार्थक** प्रा. कृ. नवीनचन्द्रन्	१
२.	**आशीर्वाद** ॲड. श्री. मु. ल. वैद्य	३
३.	**परमपूजनीय श्री. गुरुजीका भारतीय मजदूर संघ को मार्गदर्शन**	५
४.	**कामगारांचे भविष्यातील आशास्थान** भा. म. संघ स्थापना दिवस	७
५.	**श्रम-दिवस-१ मे हा भ्रम** १ मे चा तथाकथित कामगार दिवस	१३
६.	**हिन्दूत्व मान्य करणे हाच कम्युनिस्टांना एकमेव पर्याय** वृत्तपत्र प्रतिनिधीशी मुलाखत	१९
७.	**वादग्रस्त कामगार विधेयके** काळाकायदा विरोधी दिवस	२५
८.	**व्यसनमुक्ती : कामगार संघटनांची जबाबदारी** जागतिक व्यसनमुक्ती दिवस	३५
९.	**श्रमिकीकरण** राष्ट्रीय श्रम दिवस	३९
१०.	**स्वदेशी-आवश्यकता व शक्यता** स्वदेशी व्रत संकल्प दिवस	४६

अनु. क्र.	लेखाचे शीर्षक	पृष्ठ क्र.
११.	"सहनाववतु . . . ." सहकाराचा मूलमंत्र	५२
१२.	प्रेरणादायी नेतृत्व मा. श्री. दत्तोपंत ठेंगडी यांचा ५१ वा वाढदिवस	५६
१३.	Right to Work	६१
१४.	Moral Education for Workers World Moral Re-armament Day	६७
१५.	श्री. आठवलेजी के भाषणों से कुछ अंश	७०
१६.	डंकल प्रस्ताव–गुलामीची सनद	७६
१७.	अनावृत्त पत्र	८२
१८.	स्फूर्ति–गान	८४
१९.	श्रद्धांजली	८५
२०.	स्व. बाळासाहेब साठये प्रथम श्राद्ध दिवस	८७
२१.	स्व. रामनरेश सिंहजी (बडे भैय्या) स्मृती–ग्रंथ विमोचन दिवस	९१
२२.	स्व. माऊराव अत्रे श्रद्धांजली	९५

●

सार्थक

भारतीय मजदूर संघ के स्थापना के पश्चात् रा. स्व. संघ के अनेक प्रचारक तथा तत्सम कार्यकर्ताओंका मजदूर क्षेत्र मे प्रवेश हुआ। मा. श्री. दत्तोपंत ठेंगडीजी के समर्थ मार्गदर्शन में इन कार्यकर्ताओंने अथक परिश्रम से भा. म. संघ को आज का विशाल स्वरूप प्राप्त करा दिया। उन प्रमुख कार्यकर्ताओं में मा. श्री. गोविन्दरावजी आठवले, भी एक रहे हैं। विदर्भ, मध्यप्रदेश, गुजराथ, महाराष्ट्र इ. प्रांतों के मजदूर क्षेत्र में वे सर्व परिचित हैं। ३० वर्षों के उनके कार्यकाल में उन्होंने प्रारंभिक कार्यकर्ताओं के तरह सैंकडो भाषण दिये। मजदूर आंदोलन के विषय में अनेक लेख लिखे, विस्तृत पत्रव्यवहार से कार्यकर्ताओं का मार्गदर्शन किया। महाराष्ट्र विधान परिषद में भी उनके भाषण बहुत प्रभावी रहे। इन सभी का संकलन उपयोगी सिद्ध हो सकता है। किन्तु इस छोटीसी पुस्तिका में श्री. आठवलेजी ने लिखे कुछ ही लेखों का संकलन किया है, वह भी व्यक्तिगत उपयोग हेतु ही है।

मा. श्री. आठवलेजीसे लेखों के प्रकाशन की अनुमति लेते समय उन्होंने कहा की इस सबका श्रेय मेरे तीर्थरूप माता पिता का संस्कार, रा. स्व. संघ की शिक्षा, गुरुजनों की कृपा और कार्य के लिये जिन्होंने मुझे प्रोत्साहित किया वे मेरे दो सत्प्रवृत्त बंधु, स्व. बडी भाभीजी और छोटे बंधु की पत्नी, परिवारके अन्य सभी सदस्य तथा सुहृदजन इन्हीको है। साथही अपनत्व और निःस्वार्थभावसे जिन कार्यकर्ताओं और वकील मित्रों ने कार्य में सहयोग दिया उनको विशेष श्रेय है।

लेख प्रकाशित करने की अनुमति के लिये मैं श्री. आठवलेजी का आभार मानता हूँ। वैसेही प्रकाशन खर्च का भार श्री. आठवलेजी ने स्वयं ही उठाया है इसलिये भी मैं उनका आभारी हूँ।

'अक्षय मुद्रा' के संचालक श्री. आनंदजी पुराणिक तथा उनकी धर्मपत्नी सौ. अल्काजी ने यह पुस्तिका अतीव आत्मीयता से और शुद्धता से मुद्राक्षरांकित की अतएव मैं उनका आभारी हूँ !

इस प्रकाशन से कार्य की कुछ प्रेरणा तथा ध्येयदृष्टी प्राप्त होगी यह मेरा विश्वास है और इसी में मेरे प्रयास का सार्थक होगा।

प्राध्यापक कृ. नवीनचंद्रन्
(संकलक)

आशीर्वादाचे दोन शब्द

माझे स्नेही श्री. गोविन्दराव आठवले, ॲडव्होकेट हे एक अनुभवी आणि कामगार क्षेत्रातले प्रथितयश कार्यकर्ते आहेत. आज भारतीय मजदूर संघाला (बी.एम.एस) भारताच्या कामगार क्षेत्रांत जे महत्वाचे आणि मानाचे स्थान मिळाले आहे, त्यात त्यांचा फार मोठा वाटा आहे. ते एक उत्तम वक्ते आणि उत्तम संघटक आहेत. ते कांही काळ महाराष्ट्र विधान परिषदेचे सदस्य होते. भा. म. संघाचे एक राष्ट्रीय मंत्री पण होते. या काळांत अतिशय परिश्रम घेऊन विधान परिषदेत जे अमोल कार्य केले त्याची प्रशंसा मुक्त कंठाने त्यांच्या विरोधी पक्षाने देखील केली होती.

त्यांनी भा.म. संघ व अन्यत्र वेळोवेळी वर्तमान पत्रांत लिहिलेल्या लेखांचा व त्यांच्या अप्रकाशित भाषणांच्या टिपणांतून कांही अंश याचा संग्रह पुस्तक रूपाने प्रसिद्ध होत आहे, ही अत्यंत आनंदाची गोष्ट आहे. हा लेखसंग्रह कामगार कार्यकर्त्यांनाच नव्हे तर इतर सामाजिक कार्यकर्त्यांना सुद्धा मार्गदर्शक ठरेल याची मला खात्री आहे. कवी कुलगुरू कालिदास यांनी म्हटले आहे की विद्वानांची भाषा आणि लेखणी प्रगल्भ असावी "सरस्वती श्रुत महतां महीयताम!" या लेख संग्रहात अशी प्रगल्भता आपणाला जागोजागी आढळून येईल.

परमपूजनीय श्री. गुरुजींच्या मार्गदर्शनाचा अमोल ठेवा त्यांनी सुरवातीलाच प्रकट केला आहे. भा.म. संघाच्या स्थापना दिवसाच्या वेळी केलेल्या सांगोपांग चर्चेत भा.म. संघ स्थापना ही 'काळाची गरज होती' असे म्हटले आहे. राष्ट्रवादी व या मातीशी नाते सांगणारी संघटनाच देशाला तारक ठरेल हे आज निर्विवाद सिद्ध झाले आहे. आपल्या राष्ट्राचा कामगार दिन १ मे नसून विश्वकर्मा दिन हाच खरा राष्ट्रीय कामगार दिन आहे, याबद्दल या लेखांत सुंदर विवेचन आहे. १ मे मानणाऱ्या कम्युनिस्ट प्रेरित कामगार संघटनांनी भारत-चीन युद्धाच्या वेळी घेतलेला पवित्रा किती धोकादायक होता याची आठवण अजून जनता विसरली नाही. व्यसनमुक्ती या लेखांत कामगार संघटनांची जबाबदारी दाखवून दिली आहे व उत्पादनवाढीकडे लक्ष द्यावे असा इशाराही दिला आहे. वादग्रस्त विषयांच्या लेखांतून कामगार कायद्यांचा त्यांचा सूक्ष्म अभ्यास लक्षांत येतो तसेच भा.म. संघाच्या त्रिसूत्रीपैकी "श्रमिकीकरण" यात उद्योगांचे श्रमिकीकरण लोकशाहीकरण

व जपानमधील पैतृकीकरण (हा शब्द त्यांचा आहे) या सिद्धांताचा मौलिक उहापोह केलेला आहे. त्यांच्या भाषणांच्या टिपणातून निवडक वाक्ये म्हणजे गोविन्दरावांचे कामगार क्षेत्रातील अनुभवाचे बोल आहेत. ते जसे अनुकरणीय वाटतात तसे कार्यकर्त्यांना कार्यातील खांचखळगे दाखविणारे आहेत यात संशय नाही. कामगार शिक्षणाच्या पाठ्यक्रमात नैतिक शिक्षणाचा अंतर्भाव व्हावा ही त्यांची सूचना कामगार शिक्षणातील मोठी उणीव भरून काढणारी आहे.

पोलादीपुरूष म्हणून विख्यात असलेले बडेभैय्या (स्व. रामनरेश सिंह), स्व. बाळसाहेब साठ्ये व स्व. अत्रे यांना श्रद्धांजली अर्पण करणाऱ्या लेखांत त्या व्यक्तिच्या कर्तृत्वाचे विविध पैलू मांडतांना त्यांचे व्यक्तिचित्रण जसे सूक्ष्म दिसते तसेच त्यांचे अंतःकरण कसे मृदु आहे याची प्रचिती येते. ते लिहितात "स्व.बडेभाई के जानेके पश्चात बालासाहाबका न रहना अति दुःखदायक है। विशेषकर मा. ठेंगडीजीको यह क्षति बहुतही दुःखदायक है।" मा. दत्तोपंत ठेंगडी आणि बडेभैय्या यांची जोडी कामगार क्षेत्रात रामलक्ष्मणासारखी होती. या तीन व्यक्तींना श्रद्धांजली अर्पणाचे लेख दिवंगत अशा भा.म. संघाच्या, ज्यांचा पुढे विसर पडेल, यांना अर्पण केले आहेत हे फारच औचित्यपूर्ण आहे.

"नाही चिरा नाही पणति
तेथे कर माझे जुळती।।

• गोविन्दरावांच्या हातून असेच आणखी लेखन व्हावे व शोषित पीडित दलित जनोंका ..... या भा.म. संघाच्या गीतात म्हटल्याप्रमाणे त्यांच्याकडून समाजसेवा घडावी ही परमेश्वराजवळ प्रार्थना करून मी माझे दोन शब्द संपवितो.

नागपूर
दिनांक २६-६-९२
ज्येष्ठ कृ. ११, शके १९१४

मु. ल. वैद्य
ॲडव्होकेट,
भूतपूर्व अध्यक्ष, भारतीय मजदूर संघ
विदर्भ

परम पूजनीय श्रीगुरुजी का भारतीय मजदूर संघ को मार्गदर्शन

- मजदूरों के प्रति माता के समान आत्मीयतापूर्ण अर्थात् निःस्वार्थ भाव से व्यवहार करें तो कार्यकर्ता विश्वासपात्र बनेगा और संघटन दृढ होगा।

- मजदूर संघटन मुख्यतः अधिकारों (Rights) के लिये संघर्ष करते दिखाई देते हैं। अपितु इसके साथ उनके मन में कर्तव्य का (Duties) जागरण करना भी आवश्यक है।

- अपनी परिभाषा में 'अधिकार' शब्द योग्यता एवं अर्हता के अर्थ में उपयोग में लाया जाता है। मजदूरों की योग्यता, कार्यकुशलता, काम के प्रति समर्पण इस अर्थ से भी उसका जागरण आवश्यक है।

- यदि हडताल का अधिकार मूलभूत अधिकार (Fundamental Right) मानते हो तो, किसी भी कीमत पर उसे छोडना नहीं चाहिये। (संदर्भ :- १९६१ में केन्द्रीय कर्मचारियों के देशव्यापी हडताल के समय उस समय के केन्द्रीय अर्थ मंत्री महोदय ने, हडताल का अधिकार त्याग देने पर, जे.सि.एम पुनः गठित करने की घोषणा की थी।)

- वैधानिक रूप में ८.३३ प्रतिशत बोनस की मांग भा.म. संघ ने उठायी है किन्तु इसका भी ध्यान रहे कि, वेतन -बोनस जैसी समस्यायें अधिकतर द्विपक्षीय समझौते से ही हल करना अंततोगत्वा लाभदायक होता है; अतएव यह ध्यान रहे कि दोनों पक्षों की दान -त्याग प्रवृत्ती क्षीण न हो पावें।

- सामूहिक सौदेबाजी (Collective Bargaining) और संख्या बल के आधार पर डकैति (High way Robbery) इसमें क्या अंतर है ? दोनों पक्षों को अर्थात शासन, उद्योगपति एवं मजदूर इन को इस पद्धति का गंभीर सोचना होगा। संभवतः राष्ट्रवादी दृष्टिकोन देनाही इसकी प्राथमिक आवश्यकता है। अर्थात श्रमिकउद्योग तथा समाज हित जिस में निहित होगा, वही मार्ग अपनाना होगा।

- मजदूर संघ का अर्थ "मजदू s s र संघ झाला" यह न हो इसका ध्यान रहे।

- विधायक बनने के कारण प्रवास की सुविधा प्राप्त हुई है तो, अधिक से अधिक स्थानों पर प्रवास कर, विशाल जन संपर्ककी योजना करो।
- यूनियन का आंदोलन सफलता पूर्वक समाप्त होने पर, उस सफलता का श्रेय किसी प्रतिस्पर्धी को न मिल पाये यह देखना चाहिए। जैसे भगवान को भोग चढाने ले जाते समय, इसलिये ढककर ले जाया जाता है कि कौव्वा उस पर झडप न मार लें।
- भा.म. संघ का जो लिखित साहित्य है उसे कार्यकर्ताओं ने पढकर विचारों का मनन चिंतन कर अपने ध्येय की श्रद्धा सदैव दृढ करते रहना चाहिये।
- कार्यकर्ता जैसे जैसे अधिकाधिक निःस्वार्थ होते जाता है वैसे-वैसे उसकी कार्य क्षमता शतगुणित होती है।

कामगारांचे भविष्यातील आशास्थान

२३ जुलै हा भा.म.संघाचा स्थापना दिवस. १९५५ साली [illegible] मोजक्याच राष्ट्रवादी कार्यकर्त्यांच्या उपस्थितीत मा. श्री. दत्तोपंत ठेंगडी यांनी या अखिल भारतीय कामगार संघटनेची मुहूर्तमेढ रोवली. भा. म. संघाचे विद्यमान अ. भा. अध्यक्ष श्री. रमणभाई शहा व म. प्र. चे विद्यमान मंत्री नाम श्री. बाबूलालजी गौर हे त्या पहिल्या सभेत होते. गेल्या ३६ वर्षांत भा.म.संघाची जी विशाल संघटना देशभर उभी आहे त्या वाटचालीचा हा मागोवा घेण्याचा प्रयत्न आहे. यातून [illegible] निश्चित दिशा कामगार आंदोलनाला मिळेल असा विश्वास वाटतो.

काळाची गरज :-

कोणतीही नवी संघटना स्थापन झाली की एकच प्रश्न सर्वांना [illegible] जातो की इतक्या संघटना असतांनाहि नवी संघटना का? मा. दत्तोपंत [illegible] सहकाऱ्यांना हा प्रश्न सतत विचारला गेला होता. कामगार क्षेत्रातल्या तत्कालीन ठेकेदारांनी हेतुतः अनेक वर्षे हा प्रश्न जागता ठेवला होता व राष्ट्रवादी कामगारांचा संस्थागत अहंकार व स्वार्थापोटी हाच प्रश्न विचारत राहिले. त्या सर्वांना एकच उत्तर देण्यात येत होते की "भा.म.संघ ही काळाची गरज आहे." वर्ग संघर्ष, [illegible] समन्वय व समाजवादी ध्येय असणाऱ्या संघटना हया कालबाह्य ठरतील [illegible] राष्ट्रवादी - निखळ कामगार हिताची जोपासना करून संपूर्ण समाज [illegible] ध्येय असलेली, या मातीशी नाते सांगणारी संघटना देशाला तारक ठरेल [illegible] घोषित केले गेले. रा. स्व. संघाच्या मुशीत तयार झालेले प्रचारक [illegible] कार्यकर्ते यांना मा. दत्तोपंतांनी मौलिक मार्गदर्शन केल्याने भा.म.[illegible] देशात दुसऱ्या क्रमाकांचे स्थान प्राप्त झाले आहे. एका प्रकारे भा.म.संघ [illegible] प्रश्न कालांतराने कालबाह्य झाला आहे. याचा थोडासा इतिहास [illegible]

महागाई विरुद्ध पहिला लढा :-

दुसऱ्या महायुद्धानंतर महागाईने कामगार व जनता हैराण [illegible] इंग्रज शासन व नंतर कांग्रेस शासनाने कामगारांना महागाईभत्ता वाढवून [illegible] प्रथा ठेवली. परंतु महागाईभत्ता ज्या ग्राहकमूल्य निर्देशांकावर [illegible] तो ग्राहक मूल्य निर्देशांक काढण्याची पद्धतच चूक असल्याने वाढीव [illegible]

भत्ता हा निरूपयोगी ठरतो असे शास्त्रशुद्ध विवेचन करून, ग्राहक मूल्य निर्देशांक सुधारण्यात यावा म्हणून सर्व प्रकारे निवेदने दिल्यानंतर १९६३ मध्ये मुंबई बंदचा यशस्वी पहिला लढा भा.म.संघाने दिला. परिणामी लकडावाला कमीशनची नियुक्ती शासनाने केली. महागाई भत्ता काढण्याची पद्धत सुधारुन कामगारांची लूट थांबवली.

राष्ट्रहित सर्वोपरी :-

चीनच्या भारतावरील आक्रमणाने प. नेहरूंच्या "हिंदी चिनी भाई भाई" या स्वप्नाळू घोषणेच्या चिंधडया उडविल्या, त्यावेळी साम्यवादी कामगार नेत्यांनी त्या आक्रमणाला विरोध करणे तर सोडाच पण प्रतिरक्षा (डिफेन्स) उद्योगांत संप पुकारून त्यांच्या देशद्रोहीतेचा परिचय जगाला करून दिला. त्यावेळी भा.म.संघाने जाहीर घोषणा केली होती की जो पर्यंत देशावर परकीय आक्रमण राहील तोवर जादा कामाचा मोबदला न घेता व वेळ पडल्यास २४ ही तास काम करण्यास राष्ट्रभक्त कामगार सिद्ध आहेत.

सामाजिक समरसता :-

१९६७ साली भा.म.संघाचे पहिले अधिवेशन दिल्लीत भरले. या अधिवेशनाचे उद्घाटन तत्कालीन रिपब्लिकन पक्षाचे अध्यक्षस्थान मा. दादासाहेब गायकवाड यांनी विभूषित केले होते. अर्थात सामाजिक समरसतेचा धडा कार्यकर्त्यांना पहिल्याच अधिवेशनात दिला गेला. पुढेही दं. [illegible], श्री. स.सु. गवई, श्री. वा.को. [illegible] इत्यादी हे भा.म.संघाच्या अनेक कार्यक्रमांत सहभागी झाले हे सर्वविदितच आहे.

प्रथम निष्ठा :-

याच अधिवेशनात दुसऱ्या दिवशी पहिल्या सत्रात मा. भाऊराव देवरस यांचे संघटनशास्त्र या विषयावर भाषण आयोजित केले होते. अनेकांची भुवया वर गेल्या परंतु असे ठरविण्यात आले की उगांच स. [illegible] (ऑक्टर्ली) तिटकारा असेल त्यांनी आताच दूर व्हावे हे बरे परंतु अनुभव निराळाच आला. दुसरे दिवशी सकाळचे प्रतिनिधींच्या निवासस्थानजवळील [illegible] स्थानावर मा. भाऊरावांचाच बौद्धिक वर्ग होता. प्रतिनिधी मंडळात स्वयंसेवक हा त्यात उपस्थित झालेच पण मुसलमान व ख्रिश्चन बंधुही तिथे उपस्थित होते.

ध्वजप्रणाम व प्रार्थना करूनच परतले. दुहेरी निष्ठेची अशी वासलात सुरूवातीलाच लावली गेली.

श्रमआयोगासमोर :-

१९६८ मध्ये श्रमआयोगासमोर एक विस्तृत निवेदन भा.म.संघाने सादर केले. मा. दत्तोपंत ठेंगडी स्व. मनहरलाल मेहता व स्व. गजाननराव गोखले या तिघांनी हा ग्रंथ (लेबर पॉलीसी) श्रम-नीती लिहिला. तो आज व कदाचित पुढील ५०-६० वर्षासाठी तरी कामगार क्षेत्राला मार्गदर्शक राहील. बोनस आयोगासमोरही बोनसची एक नवीन व्याख्या देण्यात येऊन बोनस हा प्राप्त परिस्थितीत उद्योगाच्या नफ्यातील हिस्सा नसून उद्या दिले जाणारे वेतनच आहे असा सिद्धांत मांडला. परिणामी ८.३३% बोनस हा कायद्याने अनिवार्य लागू झाला.

संयुक्त कृती समितीत :-

केंद्रीय कर्मचाऱ्यांच्या मागण्यासाठी त्यांच्या संघटनेला पूर्ण सहाय्य देण्याचे देशांतील साम्यवाद्यांसह सर्व कामगार संघटनांनी निर्णय घेतला. त्यात भा.म.संघही सामील झाला. नागपूरचे एक पुढारी लेखकाला सांगते झाले होते की कम्युनिष्टांबरोबर आपण राहणे हिताचे नाही व दुसरे असे की त्यांच्याबरोबर जो राहील तो संपाप्त होतो असा अनुभव आहे. त्यावर श्रीगुरूजींनी म्हटल्या [illegible] जर साम्यवाद्यांबरोबर राहून आपण नष्ट होणार असू तर आपण नष्ट होण्या[illegible] आहोत हे सिद्ध होईल असे उत्तर तेव्हा दिले होते. आम्ही बरोबर होतो [illegible] संपला. आज याचा कसा प्रत्यय येत आहे हे सांगण्याची गरज नसावी.

आक्रमक भूमिका :-

याच कार्यक्रमाचे अंतर्गत देशातील सर्व कामगार संघटनांचे संमेलन १९७१ च्या जानेवारीत दिल्लीत घेण्यात आले होते. ऐनवेळी [illegible] कम्युनिस्टांच्या आयटक सभागृहात घेण्याचे जाहीर झाले. [illegible] संघटनाचे (इंटुक वगळता) नेते उपस्थित झाले त्यात कॉ. डांगे, कॉ. [illegible] बर्धन, जॉर्ज फर्नांडिस, बगाराम तुळपुळे, चित्तबसु, श्री दसीगत, [illegible] कम्युनिस्ट व अन्य समाजवादी हे ही होते.

संमेलनाचे उद्घाटन १० चे ऐवजी १ वाजता झाले. मध्यंतरीच्या [illegible] योजनेनुसार सभागृहात उपस्थित भा.म.संघाचे २०० प्रतिनिधी [illegible]

परिपूर्ण सांघिक गीते म्हणत राहिले. सर्वच त्यात तल्लीन झाले होते. सुरूवात होण्यासाठी घंटी वाजताच कॉ. मिरजकर जे इतका वेळ डोळे मिटून देशभक्ती पूर्ण गीतांच्या आनंदात तल्लीन होते - एकदम उद्‌गारले 'वन्स मोअर' ! झाले ! ते संघगीत पुन्हा म्हटले गेले. अनेकांच्या अंगाचा तिळपापड झाला असेल पण कॉम्रेडांच्या बालेकिल्ल्यात घुसून भारत मातेचा जयजयकार करून भा.म.संघाने एक प्रकारे आपले लक्ष्यच तिथे प्रकट करून दिले.

संप शेवटचे हत्यार-पण मूलभूत हक्क :-

केंद्रिय कर्मचाऱ्यांच्या संपामुळे त्यांच्या संघटनेची मान्यता केंद्र सरकारने रद्द करून जेसी.एम. मधुनही ह्यांचे उच्चाटन केले होते. मध्यस्थीच्या प्रयत्नाचे वेळी तत्कालीन वित्तमंत्री मा. श्री. मोरारजी भाई देसाई असे म्हणाल्याचे प्रकाशित झाले की कामगार संघटना जर संपाचा हक्क सोडून देतील तर त्यांना पुन्हा मान्यता देऊ. श्रीगुरूजींनी त्याचवेळी मा. दत्तोपंताना सहज विचारले की संप हा मूलभूत अधिकार आहे ना? प्रश्नाचा रोख समजून लगेच दत्तोपंतांनी वक्तव्य प्रकाशनाला दिले की कोणतीही किंमत द्यावी लागली तरी कामगार त्यांचा संपाचा मूलभूत अधिकार सोडणार नाही. शांततेच्या काळात लोकशाही देशात संप हे शेवटचे हत्यार म्हणून मानल्या मुळे भा.म.संघाने १९७४ च्या रेल्वे संपात भाग घेतला. त्यावेळी भा.म.संघाचे शेकडो कामगार कारावासात गेले. कित्येक निलंबीत झाले व अनेक बडतर्फही. पण हा संप शांतता पूर्ण घडवून आणण्यात भा.म.संघाचा सिंहाचा वाटा होता. सरकार दरबारी याची नोंद आहे की संपात भा.म.संघ असल्यानेच रेल्वेवर घातपाती कृत्ये व हिंसाचार झाले नाहीत.

राष्ट्रीय श्रमदिवस :-

देशातील कामगारांना प्रेरक ठरणारा विश्वकर्मा जयंती हाच दिवस आपला राष्ट्रीय श्रम दिवस मानला जावा ही कल्पना सर्व देशभक्त कामगार व विचारवंतांना मान्य झाली. नागपूरचे स्व. डॉ. काशीकरजी, मान्यवर श्री. [illegible] धाबेसाहेब हे तर भा.म.संघाने आयोजित राष्ट्रीय श्रमदिवसाच्या कार्यक्रमात अनेकदा सहभागी झाले आहेत.

आमचे राष्ट्रीयत्व :-

१९७१ साली ग्वालेर येथे भा.म.संघाच्या महासंमेलनात अधिवेशनात सर्वप्रथम मा. श्री. दत्तोपतांनी हिंदुराष्ट्रीयत्वाचा उच्चार करून हिंदुत्वाभिमानीच्या

निर्देश केला होता. रामजन्मभूमी मुक्ती आंदोलनात सक्रीय भाग घेऊन भा.म.संघाने त्यावर शिक्का मोर्तब केलेच आहे.

युगानुकूल घोषणा :-

दुनिया के मजदूरों एक हो - कमायेगा सो खायेगा, चाहे जो मजबूरी हो हमारी मागे पूरी हो, वर्ग संघर्ष हमारा नारा है अशासारख्या समाजद्रोहाला उद्युक्त करणाऱ्या घोषणाची स्व. रामनरेश सिंह (बडे भैया) यांनी चिरफाड करून देशभक्त मजदूरों एक हो - देश के लिए करेंगे काम - काम के लेंगे पूरे दाम - कमायेगा सो खिलायेगा, अन्याय के विरोध में संघर्ष नारा है- या समाजभक्तीची प्रेरणा देणाऱ्या घोषणा देऊन देशभक्तीचे नवे पर्व कामगार क्षेत्रात आरंभ केले

आंतर्राष्ट्रीय क्षेत्रांत मान्यता :-

चीनचा प्रवास करून परतल्यावर स्व. मनहरभाईंनी असे नमूद केले आहे की भा.म.संघाचे अनेक सिद्धांत चीन सरकारला स्विकारावेसे वाटतात. [illegible] रशियातील ८०% उद्योग खाजगी क्षेत्राकडे सोपविण्याचा निर्णय घेतला व त्यातील कामगार व त्यांच्या सहकारी संस्था उद्योग घेण्यास तयार असतील तर त्यांना प्राधान्य देण्याची घोषणा करून श्रमिकिकरणाचे समर्थनच केल्याचे दिसते. आंतर्राष्ट्रीय श्रम संघटनेत बाली चक्र व मिटलेली मूठ हे भा.म.संघाचे चिन्ह फारच वाखाणले गेले आहे.

लोकशाही निष्ठा :-

आणीबाणीत स्थितीचा इतिहास ताजाच आहे. त्यावेळच्या निवडणुकीत [illegible] जनतंत्र मजदूर मोर्चा स्थापन करून भा.म.संघाने लोकशाही निष्ठेची [illegible] दिली होती.

आर्थिक संकटाचे संकेत :-

भा.म.संघाचे पूर्वाध्यक्ष स्व. मनहरभाई मेहतांनी त्याच्या मृत्यूच्या [illegible] दिवस पूर्वी मुद्रास्फिती, महागाई रोखण्यात शासनाला आलेले अपयश, [illegible] वेतन देण्यास असमर्थता, बहुराष्ट्रीय कंपन्यांनी देशाची चालविलेली अपार लूट, स्वदेशीचा अभाव, उद्योगाचे विकेंद्रीकरण न करणे इत्यादी अनेकविध कारणांनी देश भयानक आर्थिक गुलामगिरीच्या संकटात सापडत असल्याने त्याविरुद्ध एक

नवा स्वातंत्र्य लढा द्यावा लागेल असा संदेश दिला होता. त्यांच्या लेखनाचा थोडक्यात विचार असा की भा.म.संघाने प्रथमपासून हा सिद्धांत मांडला की देशहित, कामगारहित, उद्योगहित व जनहित हे परस्पर विरोधी राहू शकत नाही. प्रत्यक्ष काँग्रेस पक्षाने नेमलेल्या एका नियोजन आयोगानेच म्हटले आहे की परकीयांच्या हाती उद्योगांचे मालकी हक्क सोपवू नये, परकीयांचा पैसा गुंतविला गेलेल्या उद्योगांचे भारतीयकरण करण्यात यावे, खाजगी उद्योगात पैसा लावणाऱ्या परदेशीयांच्या सर्व व्यापारिक सवलती बंद करण्यात याव्या. परंतु काँग्रेस सरकारने या सूचनांना हरताळ फासला. देशात बेरोजगारीचा भयानक प्रश्न उभा असतांना संगणीकरणाचे तंत्रज्ञान देशाला परवडणारे नाही. बहुराष्ट्रीय कंपन्या या स्वांतत्र्यपूर्वकाळातील विदेशी कंपन्याचे नवे रूप आहे.

आज भारताला अंतर्राष्ट्रीय मुद्रा कोषाकडे भीक मागावी लागत आहे. कदाचित आज कर्ज घेऊन थोडा काळ निभावून नेता येईल परंतु ते कर्जही फेडण्याची वेळ केव्हांतरी येईलच. तेव्हा चक्रवाढ व्याजाने द्यावयाची ही अफाट रक्कम फेडण्यासाठी देशच गहाण ठेवला जाईल काय? यासाठी आधुनिक तंत्रज्ञान पारंगत परंतु परदेशात स्थायिक झालेल्या भारतीयांना देशभक्तीचे आवाहन करून त्यांच्या सेवा देशाला उपलब्ध करून घेण्याची योजना करावी लागेल. भारतातील जास्तीत जास्त व कमीत कमी उत्पन्नाचा अनुपात ठरावा लागेल, भारतीय परिस्थिती नुसार गरिबी रेखेची पुनर्व्याख्या करावी लागेल. एकूण सर्वच आर्थिक नितीला भारतीय अर्थशास्त्राचा आधार घ्यावा लागेल. भा.म.संघाचे अध्यक्ष श्री.मनसुखभाई मेहता व मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी मागणी केल्याप्रमाणे देशातील सर्वपक्षांची याबाबत चर्चा घडवून आणावी लागेल.

हेच भा.म.संघाला अभिप्रेत आहे.

वरील सर्व घटना, प्रसंग विवेचन इत्यादी पाहता हे मान्य करण्यात हरकत नसावी की भा.म.संघ कां ह्या प्रश्नाचे त्यावेळी दिले गेलेले उत्तर "ही काळाची गरज आहे" हे निर्विवाद सिद्ध झाले आहे व भा.म.संघाने दिलेले सिद्धांत राष्ट्रातील कामगारांना दीपस्तंभाप्रमाणे मार्गदर्शन करण्यास समर्थ ठरावे.

श्रम दिवस : १ मे - हा भ्रम

नागपूरच्या दै. तरूण भारतात दि. १ मे १९९२ ला "नागपूर विदर्भातील कामगार दिवस" हा डॉ. गो.नी. हडप, यांचा प्रकाशित झालेला लेख खूपच माहितीपूर्ण असल्याने नव्या पिढीला या भागातील कामगार चळवळीतील महत्वाचे कार्यक्रम माहित होतील व जुन्यांच्या स्मृतीला उजाळा मिळेल म्हणून लेखकाला धन्यवाद.

सुरवातीलाच संपादकानी लेखाच्या प्रयोजनाचा उल्लेख करतांना म्हटले की, १ मे हा आंतर्राष्ट्रीय दिवस म्हणून साजरा केला जातो व लेखकानी शेवटच्या परिच्छेदात खालील उल्लेख केला आहे. "जगातील कामगारांनो एक व्हा या संदेशात भारतीय कामगारांनो एक व्हा असा गर्भितार्थ त्यामध्ये आहे. हे विसरून चालणार नाही" या विधानावरून कामगार दिनाची थोडी अधिक माहिती, मनात आलेले विचार व माझा या क्षेत्रातील अनुभव प्रकट करीत आहे.

प्रश्न असा की १ मे या दिवसाला आंतर्राष्ट्रीय कामगार दिवस म्हणून कोणी स्वेच्छेने मान्यता दिली आहे की हा दिवस तसा लादला गेला आहे. अमेरिका, इंग्लड, आस्ट्रेलिया, जपान, फ्रान्स यापैकी एकाही देशात १ मे [illegible] कामगार दिन म्हणून मानला जात नाही. भारतातही वस्तुतः आपल्या पारंपरिक श्रम दिवस शतकानुशतके पाळला जात असलेला विश्वकर्मा जयंती [illegible] प्रतिष्ठेचा म्हणून मानला जातो. वरील प्रत्येक देशाचा स्वतंत्र कामगार दिवस आहे. पारतंत्र्यात अनेक मूल्यांसह भारतीयांना विश्वकर्मा दिवसाचे विस्मरण झाले. ही गोष्ट निराळी. १९४७ मध्ये इंटूक या कामगार संघटनेची कांग्रेसने [illegible] केल्यानंतर त्यांचे तर्फे ३ मे हा दिवस कामगार दिवस म्हणून मानला [illegible] यावरून हे मान्य व्हावे की १ मे हा दिवस खऱ्या अर्थाने आंतर्राष्ट्रीय श्रम दिवस नाही.

१मे चा थोडक्यात इतिहास असा की, १८८६ साली [illegible] (अमेरिकेत) येथे कामगारांनी ८ तासाच्या कामाच्या मागणीसाठी आंदोलन [illegible] त्यातून उद्भवलेल्या दंगलीत कांही कामगार ठार झाले त्यानंतरही या [illegible] कोणालाच स्मरण नव्हते. पुढे रशियात १८८९ मध्ये सेंकड इंटरनॅशनलनी [illegible] करून १४ जूलै ला सर्व जगभर व सर्व शहरात भांडवलशाही देशांनी [illegible]

कामगारांच्या शोषणाविरुध्द संपाचे आवाहन केले. पुढे अमेरिकन भांडवलशाही व अमेरिकन साम्राज्यवाद यांच्या निषेधार्थ १ मे दिवस पाळण्याचे साम्यवाद्यांनी ठरविले. हिंदुस्थानात सर्व प्रथम १ मे १९२६ ला मुंबई येथे परळच्या कामगार मैदानावर कॉ. श्री. अ. डांगे यांनी कामगार दिनाची सभा घेतली. त्याआधी कॉ. सिंगरवेलू चेट्टीयार यांनी मद्रासला १९२३ मध्ये १ मे दिवस पाळला. त्या दिवशी झालेल्या भाषणात भांडवलशाही (अमेरिकिन इंग्लंड) साम्राज्यवादाचा निषेध हाच विषय प्रखरपणे व प्रमुखपणे मांडला होता हे नमुद आहे.

१९२०मध्ये ए. आय.टी.यु.सी.ची स्थापना झाली. स्थापनेच्या अधिवेशनात अध्यक्ष देशभक्त लाला लजपतराय यांचे भाषण झाले. त्यांनी म्हटले की जगांतील कामगारांच्या समस्या साधारणपणे सारख्याच आहेत. पण भारतांत आम्हाला साम्यवाद्यांचे अनुकरण करण्याचे कारण नाही. राष्ट्रहिताच्या चौकटीतच आपण कामगार समस्यांचा विचार केला पाहिजे. या संघटनेला थोर थोर देशभक्तांनी म्हणजे लाला लजपतराय, स्वागताध्यक्ष लोकमान्य टिळक, पुढे व्हि.व्हि. गिरी, व प्रत्यक्ष गांधीजींनी मार्गदर्शन केले. परंतु हे सर्व नेते देशाच्या राजकीय स्वातंत्र्याच्या आंदोलनात इतके व्यस्त होते की या संघटनेला पूर्णतः राष्ट्रवादी तत्त्वावर चालविण्यासाठी आवश्यक चिंतन करण्यात त्यांना वेळच नव्हता. नेमका याच गोष्टीचा फायदा घेऊन साम्यवाद्यांनी या संघटनेत मोठ्या प्रमाणात घुसपैठ केली, इतकी की भारताच्या स्वातंत्र्याच्या चळवळीला त्यांनी विरोध तर केलाच पण सरड्याप्रमाणे सतत रंग बदलवत रशियन साम्राज्यवादाचा पुरस्कार करण्यात धन्यता मानली. कॉ. डांगे यांनी तर महात्माजींवर टीका करण्याचेही सोडले नाही. तशात रशियन क्रांतीचा प्रभावही इथल्या बुध्दिवाद्यांवर पडत चालला होता. १९२०ते १९३० या काळात साम्यवाद्यांनी ही कामगार संघटना पूर्णपणे बळकावली व लाला लजपतराय यांच्या अध्यक्षीय भाषणाला विकृतपणे मांडले. "जगातील कामगारांनो एक व्हा" या घोषणेचे ते समर्थक होते व हाच कामगार दिनाचा संदेश आहे, असा त्यांच्या नावाने प्रचार सुरू केला व वर उल्लेखिल्या प्रमाणे १ मे १९२७ ला डांगे यांनी कामगार दिन म्हणून पाळला. व पुढे सुरू ठेवला. यात कामगार कल्याणाचा खरा हेतु नसून भांडवलशाही व अमेरिकन /इंग्लिश साम्राज्यवादाचा निषेध हाच अंतस्थ हेतु होता. हे पुढील विवेचनावरून स्पष्ट होईल.

त्या काळात आम्ही सर्वच बाबतीत कधी पाश्चिमात्यांचे, कधी क्रांतीने दिपवून टाकणाऱ्या साम्यवाद्यांचे, आत्मविस्मृतिमुळे अंधानुकरण करण्यात धन्यता मानत होतो. आम्ही आत्मविस्मृत नसतो तर १९८६ च्या तब्बल २४ वर्ष पूर्वी म्हणजे १८६२ मध्ये हावरा येथे १२०० रेल्वेकामगार आठ तासाच्या मागणीसाठी संपावर गेले होते, तोच आम्ही कामगार हक्क दिवस म्हणून मानला असता. ही देशाच्या भाग्याची गोष्ट आहे, की देशभक्ती जागृतीच्या यज्ञातून प्रेरणा घेऊन मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी १९५५ मध्ये भारतीय मजदूर संघाची स्थापना केल्यानंतर या देशाचा पारंपारिक श्रम दिवस म्हणून विश्वकर्मा जयन्ति हाच आमचा राष्ट्रीय श्रम दिवस असू शकतो याची जाणीव कामगारांना करून दिली व देशातील कामगार चळवळीला राष्ट्रवादाचे अधिष्ठान दिले.

यावरून हे स्पष्ट व्हावे की १ मे हा दिवस आम्ही स्वेच्छेने स्विकारलेला नाही तर तो साम्यवाद्यांनी आमचेवर लादला आहे. त्यातही हा दिवस त्यांनी कामगारांच्या हौतात्म्याचे स्मरण म्हणून नव्हे, ठार झालेल्या कामगारांविषयी प्रेम म्हणूनही नव्हे, त्यांच्या त्यागाची स्मृती म्हणूनही नव्हे तर भांडवलशाही देशांचा निषेध म्हणून! कारण त्या पेक्षाही भयानक अत्याचार स्टॅलिनने स्वतः रशियन लोकांवर केले, ४० लाख लोक ठार केले, त्याचा निषेध साम्यवाद्यांनी कधीही ऐकिवात नाही. मग हा दिवस क्रांतीचा म्हणून कसा मानायचा ? कामगारांना यातून कोणती प्रेरणा मिळणार? साम्यवाद्यांची कामगार हिताशी निष्ठा आहे हे म्हणावे तर रशियातील एका उच्च साम्यवादी नेत्यानी हे स्पष्ट म्हटलेले आहे की सत्ता प्राप्तीचे एक साधन-शिडी म्हणून आम्ही कामगार संघटना वापरतो व सत्ता प्राप्त होताच लाथ मारून ती शिडी आम्ही ढकलून देऊ. अर्थात जगातील कामगारांनो एकत्र व्हा ही एकतेच्या प्रामाणिक भावनेतून दिलेली घोषणा आहे काय असे [illegible] तर वरील वक्तव्यावरून त्याचे "नाही" हेच उत्तर द्यावे लागते. [illegible] महायुध्दात जर्मनीतील कामगारांचे विरुध्द रशियन कामगार का लढले ? [illegible] इथे एका बंगालातच डाव्यांचे २४ गट आहेत. सगळेच १ मे पाळतात मग स्वतंत्र स्वतंत्र सभा घेतल्या जातात. एका मंचावर येऊन एकतेचे उदाहरण [illegible] नाही तिथे जगातील कामगारांना ही घोषणा एकतेची प्रेरणा कशी देणार ? [illegible] ही घोषणा देशद्रोहाला प्रेरित करणारी म्हणूनच देण्यात आली होती. [illegible] देशातील कामगार हे रशियन साम्राज्याचे हस्तक म्हणून उपयोगी पडावे [illegible]

खरा हेतु होता. साम्यवादी फक्त पश्चिमात्यांच्या साम्राज्यवादांचा विरोध करतात पण त्यांना रशियन साम्राज्यवादच अभिप्रेत होता. स्वाभाविकच चीनच्या आक्रमणाचे साम्यवाद्यांनी मुक्तीसेना म्हणून स्वागत केले होते, हे अजून सर्वांच्या स्मरणात ताजे आहे. पाकिस्थानच्या आक्रमणाचे वेळी तर कम्युनिस्ट संघटनेने प्रतिरक्षा (डिफेन्स) उद्योगांत संपाची घोषणा केली होती म्हणजे ही घोषणा देणारे देशद्रोहीच होते.

आम्ही हे अनुभविलेले आहे की ज्या ज्यावेळी कामगार हितांसाठी तात्त्विक मतभेत थोडा वेळ बाजूला सारून भा.म. संघ, इंटूक इ. संघटना साम्यवाद्यांसहित एका मंचावर येत, तेव्हा जगातील कामगारांनो एक व्हा म्हणणारे "भारत माता की जय" ही घोषणा देण्यास साम्यवादी विरोध करित असत. आम्हीच होतो म्हणून अट्टाहासानी कामगार क्षेत्रात भगवा व भारत माता की जय हे दोन्ही दृढमूल करू शकलो. काही महाभागांना लाल झेंड्याची जागा आता भगव्यांनी घेतली आहे हे पाहून डोक्यात तिडीक उठते! असे हे राष्ट्रभक्त! इंटूकवाल्यांनी तर साम्यवाद्यांसमोर हात टेकले व शेवटी ए.आय.टी. यु.सी. सोडून त्यांना इंटूकची स्थापना करावी लागली. तसेच पाहिले तर इंटूकला भारतीय राष्ट्रवादाचे अधिष्ठान कधीच नव्हते व नाही. ती केवळ राजकीय पक्षाची बाहुली म्हणूनच आजही कार्य करीत आहे. मग माझे मित्र श्री. हरिभाऊ नाईक भलेही म्हणोत की इंटूक ही कॉंग्रेसचाच एक भाग म्हणून संघटना नाही. ती स्वतंत्र आहे व असावी. राष्ट्रहित, कामगारहित व उद्योगहित ही जी त्रिसुत्री भा.म.संघानी देशहितेल कामगारांना दिली त्याच्याशी इंटूकची मुळीच बांधिलकी नाही. नवल नाही की साम्यवाद्यांशी ते कधीच टक्कर देऊ शकले नाही. (विषयांतर असले तरी यांच्या पुष्ट्यर्थ हे लिहतो की जनता पार्टीचे राज्य केंद्रात येताच इंटूकने सरळ मागणी केली होती की देशातील एकमेव मान्यता प्राप्त कामगार संघटना म्हणून मान्यता दिली तर इंटूक जनता पार्टीशी संलग्न करण्यास तयार आहे.)

रशियनसाम्राज्यवाद्यांचे हस्तक असलेल्या इथल्या साम्यवादी कामगार संघटनेच्या ए.आय.टी. यूसी ची एकेक कृत्ये नजरे समोर आणली की त्यांनी कामगार संघटना म्हणजे देशद्रोह्यांचा कसा अड्डा बनवून टाकला होता हे विचारक मनात पुढे येते. स्व. रामनरेशजी (बडेभैय्या) म्हणत असत की तीव्र द्वेषभावना, [illegible] शत्रुतेचा भाव, चूकीच्या घोषणा उदा. कमायेगा सो खायेगा, वेतन विषयता [illegible]

हो, कमालीचा देशभक्ती विरोध, धर्म संस्कृती इत्यादीचा राक्षसी विरोध या सर्व प्रकारे त्यांनी कामगारांना विकृतीने ग्रासून टाकले होते. जे जे म्हणून या देशाचे असेल त्याचा द्वेश त्यांनी शिकविला. मुक्त नितीतील कामगार उन्नतीच्या आधुनिक कल्पनांना मागे टाकणाऱ्या, कल्पनाही त्यांनी त्याज्य मानल्या. कधीही न प्राप्त होणाऱ्या भौतिक सुखाच्या भरमसाठ मागण्या करून कामगारांना भ्रमित करून टाकले. कामगार सदैव असंतुष्ट कसा राहील याच्याच योजना आखल्या (जेणे करून अंतिम क्रांतीसाठी त्याचे मन पेटलेले राहील) यासाठी रशियातून हजारो कोटीची रक्कम त्यांना मिळत राहीली असे नुकतेच आकडेवारीने प्रसिद्ध झाले आहे. एकूण रशियन साम्राज्यवादाच्या वाढीसाठीच हे सर्व खपत होते व देशभक्त कामगारात यांनी कधीही एकता होऊ दिली नाही. त्यांना कामगार हिताशी काहीच देणे घेणे नव्हते. (याचे प्रत्यंतर नुकत्याच हैदराबादला झालेल्या त्यांच्या एका अधिवेशनात क्युबाला एक जहाज भरून तांदूळ पाठविण्याचा केलेल्या प्रस्तावाचे आणून दिले, विशेष म्हणजे आपल्या देशातील कामगार उपासमारीने मरत आहेत हेही याच दमात ते म्हणतात.) अर्थात हे उघड आहे की मानवीय करुणेतून ते क्युबाला मदत करीत नसून ढासळलेल्या साम्यवाद्यांच्या एका शेवटच्या किल्याच्या संरक्षणार्थ हा ठराव आहे. अशा विकृतीने ग्रस्त कामगारांसाठी कामगार संघटना हेच त्यांचे सूत्र होते असे म्हणावे लागते. भा.म.संघाचे पूर्वमहामंत्री, स्व. रामनरेशजी म्हणत की कामगार संघटना रुग्णाचा दवाखाना नसून राष्ट्रभक्तींची शिकवण देऊन संपूर्ण राष्ट्राच्या सर्वांगीण उन्नतीसाठी शक्तिसंचय करणारी व्यायामशाळा म्हणजे कामगार संघटना असली पाहीजे.

प्रखर राष्ट्रभक्ती हाच साम्यवाद्यांचा प्रथम शत्रु होता. परंतु साम्यवादाच्या या व अनेक अंतर्गत दोषांमुळे ते तत्त्वज्ञान आचरणयोग्य न ठरल्यामुळे आता ते इतिहासात जमा होत आहे. रशियाला पुन्हा राष्ट्रवादाची कास धरावी लागली, व्यक्तीस्वातंत्र्य मान्य करावे लागले. यंदाचा १ मे दिवस त्यांनी वसंतोत्सव म्हणून साजरा केला साम्यवादाचे दफन केले.

नुकत्याच दक्षिणेत संपन्न झालेल्या एका साम्यवादी संलग्न कामगार संघटनेच्या नेत्याने हे म्हटले की लाल झेंडा त्यांनी रशियातून घेतला नाही. ते क्रांतीचे चिन्ह म्हणून घेतला, भगव्याशी आमचा विरोध नाही कारण भगवा हा तर त्याग व तपस्येचे चिन्ह आम्ही मानतो. ही राष्ट्रवादाची एक प्रकारे कबूलीच आहे.

आता सर्व विवेचनावरून हे सांगण्याची गरज असू नये की १ मे हा आंतर्राष्ट्रीय कामगार दिवस कधीच नव्हता व नाही. व "जगातील कामगारांनो एक व्हा' यांत भारतातील कामगारांनो एक व्हा असा गर्भितार्थ तर मुळीच निघत नाही.

म्हणून भा.म.संघाने विश्वकर्मा की ज्याने राष्ट्रकार्यार्थ स्वतःच्या एकुलत्या एक परंतु दैत्य, राष्ट्रद्रोही प्रवृत्तीच्या पुत्राच्या वधासाठी वज्र तयार करून दिले तोच राष्ट्रासाठी सर्वस्व त्याग करण्याची प्रेरणा देणारा दिवस आमचा राष्ट्रीय श्रम दिवस आहे हे सिध्द केले. आपल्या देशातील भ्रांत समाजवादी कामगार नेते, इंटूकचे नेते व साम्यवादाचा पराभव झाल्याने शीड तुटलेल्या जहाजाप्रमाणे अवस्था झालेले साम्यवादी हे सर्व ही सत्ये ज्या दिवशी स्वीकारतील तो या देशाचा भाग्याचा दिवस ठरेल.

हिंदुत्व मान्य करणे हाच कम्युनिस्टांना एकमेव पर्याय

प्रश्न :- गोर्बाचेव्ह यांनी साम्यवादाचे तत्त्वज्ञान पराभूत झाले अशी कबुली दिली यावर तुमची प्रतिक्रिया काय?

उत्तर :- साम्यवाद आज ना उद्या पराभूत होणारच होता. पण तो इतक्या लवकर संपेल असे वाटले नव्हते. परंतु राष्ट्रभक्ती, व्यक्तिस्वातंत्र्य, ईश्वरनिष्ठा यांची रशियात गळचेपी होत होती व तेथील समाजानेच ते तत्त्वज्ञान नाकारले म्हणूनच गोर्बाचेव्ह यांना तशी कबूली द्यावी लागली याचे श्रेय राष्ट्रभक्त, स्वातंत्र्यप्रेमी व धर्मनिष्ठ रशियन लोकांच्या जागृतीला द्यावे लागेल.

प्रश्न :- साम्यवादी तत्त्वज्ञानांतच अंतर्गत विरोध असल्याने हे झाले असे म्हटले जाते त्यावर आपले मत काय?

उत्तर :- साम्यवाद हे एक भौतिक तत्त्वज्ञान आहे. त्याचे सखोल चिंतन करून त्यातील त्रुटी मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी "कम्युनिझम आमची कसोटी" या पुस्तिकेत स्पष्ट मांडल्या आहेत. माझ्या अल्पबुद्धीला [illegible] समजते की सृष्टीच्या चैतन्य शक्तीला, त्याला कोणत्याही नावाने संबोधले तरी (ईश्वर, निसर्गशक्ती, एनरजी इ.) नाकारण्याने तत्त्वज्ञान पूर्ण होऊ शकत नाही. मार्क्सने एका ठिकाणी असे मांडले आहे की What is matter - No mind - What is mind - No matter यावर भाष्य करण्याची गरज नसावी.

प्रश्न :- या तत्त्वज्ञानाला आचारपद्धती नव्हती म्हणून हे पराभूत झाले असेल काय?

उत्तर :- हे शक्य आहे की सर्वसामान्य माणसाला दैनंदिन जीवनात आचरण्या योग्य आचारपद्धती त्यांनी दिली नसावी. आपल्या तत्त्वज्ञानांत आचार पद्धतीला अग्रस्थान दिले आहे तसे तिथे दिसत नाही.

प्रश्न :- भारतीय मजदूर संघ ही कट्टर कम्युनिस्ट-विरोधी कामगार संघटना म्हणून ओळखली जाते म्हणून तुम्हाला विशेष समाधान वाटते काय?

उत्तर :- साम्यवादी राज्यशकट उखडले गेलेले दिसते. पण अजून त्याची बीजे नष्ट व्हायची वाट बघावी लागेल.

प्रश्न :- मार्क्सला सर्व जग एक थोर चिंतक मानतात?

उत्तर :- होय, व हे खरेही असेल. पण भारताविषयी हिंदुत्वाविषयी त्यांचे पूर्वग्रह होतेच हे त्यांच्या लिखाणातून जाणवते. त्यांनाही पाश्चिमात्य संस्कृतीच हिंदुस्थानांत रुजवायची होती, हे १८५३ मधील त्यांच्या लिखाणावरून स्पष्ट दिसते. असे असू शकेल की वयोमानानुसार हिंदुस्थानाविषयी ते अभ्यास करू शकले नसतील पण इंग्रजांकडून हिंदुस्थानातील अपेक्षा त्यांनी अशा व्यक्त केल्या आहेत. "England has to fulfill a double mission in India. One destructive the other regenerating. The annihilation of the old society and the laying of material foundation of western society". (न्यूयॉर्क ट्रिब्यून, ८ ऑगस्ट १८५३.) अर्थात् येथील साम्यवादी पक्ष आरंभापासूनच हिंदुसंस्कृतीच्या इतिहास व साहित्य याच्या विरोधांत काम करीत होते.

प्रश्न :- रशियांत प्रत्यक्ष सत्ता लेनिनच्या हाती होती त्यांचेही तेच मत होते काय?

उत्तर :- भा. म. संघात आम्ही अकारण द्वेषाने साम्यवादाचा विरोध करीत नव्हतो. आपल्या देशातील त्यांच्या कार्यपद्धतीने हिंदुसमाज कसा उध्वस्त होईल, कामगार किती विषाक्त होईल याचा अभ्यास करूनच आम्ही त्या तत्त्वज्ञानाचा विरोध केला. लेनिनची नीती खालील उताऱ्यावरून समजून घ्यावी. त्यांनी अत्यंत नीच, राक्षसी पद्धतीने रशियन लोकांवर अत्याचार केले व तसेच हिंदुस्थानातही करावे हीच त्यांची शिकवण होती. सोशॅलिझमच्या प्राप्तीसाठी काय करावे, हे यावरून स्पष्ट होईल.

..... nothing can be done without the masses. And in this era of printing & parliamentarism it is impossible to gain the following of the massess without a

widely ramified, systematically managed, well equipped system of flattery, lies, fraud, juggling with fashionable and popular catchwards and promissing all manner of reforms and blessings to the workers right and left for the overthrow of the bourgeoisie. (Nihilism today मॉस्को १९७७) म्हणूनच भारतीय स्वातंत्र्य आंदोलनालादेखील त्यांची भूमिका देशविरोधाचीच होती.

हा विषवृक्ष या पवित्र पुण्यभूमीत रुजू देणे आपल्याला कधीच परवडणारे नव्हते व नाही.

प्रश्न :- आज आपल्या देशांतील साम्यवादी कामगार संघटनांची सद्यःस्थिती कशी असेल?

उत्तर :- मला वाटते - शीड तुटलेल्या जहाजासारखी असावी. म्हणून हिंदुस्थानातील साम्यवाद्यांनी मार्क्सवादी तत्त्वज्ञानाचा त्याग करून व देशातील खऱ्या राष्ट्रीयत्वाचा म्हणजेच भारतीयत्वाचा म्हणजेच हिंदुत्वाचा उघडपणे मान्यता देऊन, ज्या प्रामाणिकपणे त्यांनी साम्यवादाचा अंगिकार केला होता त्याच प्रामाणिकपणे, स्वीकार करावा व या देशाच्या मूळ प्रवाहात सहभागी व्हावे असे मी त्यांना आमंत्रण करतो.

प्रश्न :- कामगार संघटनांची धर्मनिरपेक्षतेची भूमिका काय?

उत्तर :- धर्मनिरपेक्षतेबाबत जवळ जवळ सर्वच कामगार संघटना मौन बाळगून आहेत. कामगार चळवळीत राष्ट्रीय शब्दाचा उपयोग करणाऱ्या दुकी संलग्न संघटना समजल्या जातात. परंतु राष्ट्रीयत्वाची [illegible] कांग्रेसच्या राष्ट्रीयत्वाच्या (म्हणजे भेसळीची) [illegible] भारतीय हा शब्द संघटनेच्या नांवात लावणाऱ्या कामगार [illegible] विशेषे करून भारतीय मजदूर संघाशी संलग्न आहेत. [illegible] संघटनांच्या नावांत हे दोन्ही शब्द नसून व त्यांना 'धर्म [illegible] असल्याने त्यांनी इंडिया या शब्दाचाच उपयोग केलेला [illegible] बसिवले तर साम्यवाद्यांना धर्माचे नावडे असल्याने [illegible] करण्याचे कारण नाही, असे मात्र निश्चित आहे की जे जे [illegible] (हिंदुत्ववादी) असेल त्याचे उच्चाटन करणे हेच [illegible] आहे.

परंतु आपल्या देशाचा राष्ट्रीयतेचा पाया कोणता हे सपष्ट करण्याची वेळ येऊन ठेपली आहे. भारतीय अथवा राष्ट्रीय संस्कृती म्हणजे हिंदू संस्कृतीच हे म्हणण्यांत संस्कृतीचा इतिहास व संशोधन ज्यांनी केले ते सर्वपल्ली राधाकृष्णन्, पासून न्या. छागला यांची पूर्ण एकवाक्यता आहे. हे सत्य कामगार संघटनानी स्पष्टपणे स्वीकारलेच पाहिजे तरच कामगार आंदोलनाला भारतीयत्वाची दिशा मिळेल.

प्रश्न :- कामगार संघटनांचा या प्रश्नाशी संबंध काय?

उत्तर :- अखेर प्रत्येक नागरिक मग तो कामगार असो अथवा अन्य कोणी असो एका राष्ट्रीयत्वाच्या धाग्यानेच बांधला गेला पाहिजे अर्थात हा धागा भौतिक साधन संपत्तिमध्ये नसून सांस्कृतिक मूल्यांमध्येच असू शकतो म्हणून हा प्रश्न या क्षेत्रांशी निगडीत असलाच पाहिजे. अन्यथा कामगार हा पाश्चिमात्यांप्रमाणे आर्थिक पशूच होऊन राहील. सर्व कामगार संघटना कामगारांच्या सर्वोत्कर्षासाठी प्रयत्नशील असतात पण त्या सामान्यतः भौतिक उन्नतीचाच विचार करतात. अन्न, वस्त्र, निवारा इतक्यापुरताच विचार करतांत. जीवनमूल्ये व शिक्षण इ. चा करीत नाहीत. तेवढयावरच आता कामगार संघटनांना थांबून चालणार नाही.

प्रश्न :- साधारण पणे कामगारांना समजेल अशी संस्कृतीची व्याख्या सांगता येईल काय?

उत्तर :- कै. ल. रा. पांगारकर यांनी संस्कृतीची अतिशय समर्पक व्याख्या केली आहे. "आचरण योग्य युगायुगांची प्रज्ञा" (Wisdom of Ages Transformable in day to day life) समन्वय महर्षि वैदर्भीय संत श्रीगुलाबराव महाराजांनी तर धर्माची अतिशय सुटसुटीत व जगन्मान्य व्हावी अशी व्याख्या केलेली आहे. ते म्हणतात "सत्ववृद्धी ज्यामुळे होईल तो धर्म" मला वाटते हे कामगारांना अत्यंत लागू आहे.

प्रश्न :- भा. म. संघाची भूमिका काय?

उत्तर :- भा. म. संघाने भारतीयत्वाची म्हणजेच राष्ट्रीयत्वाची प्रचीती आणून दिली आहे. सर्वप्रथम पाकिस्थान व चीनच्या आपल्या देशांवरील आक्रमणाच्या वेळी. त्यानंतर आपात्कालीन स्थितीत हुकूमशाही नष्ट करून हिंदुत्वाचा प्राण असलेली लोकशाही पुनस्थापित करण्यासाठी लोकशाही मंच स्थापन करून व तिसरा आविष्कार होता अयोध्येला

कारसेवेसाठी प्रकटपणे जथ्थे पाठविणे. त्यावेळची राजनीती व राष्ट्रनीती यातील सीमारेषा जाणून या तीनही प्रसंगी राष्ट्रीय प्रश्नांवर राष्ट्रीय भावनेने भा. म. संघ उभा राहिला. यातही हिंदु राष्ट्रीयत्वाचा अर्थात या क्षेत्रांशी संबंधित हिंदु अर्थशास्त्राचा विचार सर्व प्रथम १९७१ मध्ये ग्वाल्हेर येथील भा. म. संघाच्या महासभेच्या अधिवेशनांत मा. दत्तोपंत ठेंगडी यांनी मांडला होता.

प्रश्न :- राष्ट्रीयत्व मानणाऱ्या कामगार संघटनांची ओळख कशी व्हावी?

उत्तर :- काँग्रेसप्रणीत कामगार संघटना वर्ग मानतात पण त्या वर्ग समन्वयाचा मार्ग स्वीकारतात. साम्यवादी संघटना सरळ वर्ग व वर्गकलहच मानतात. मात्र भा.म. संघ सर्व प्राणीमात्र सृष्टी ईश्वरांश असून सर्व संपत्ति ईश्वराची व आम्ही त्याचे विश्वस्त ही हिंदुसंकल्पना मानतो. मा. गांधीजींची विश्वस्त कल्पना या विचाराच्या जवळची आहे. साम्यवाद संपुष्टात येत आहे म्हणूनच कामगार संघटनांनी स्वतःची ओळख (आयडेंटिटी) उद्घोषित करण्याची ही वेळ आहे.

प्रश्न :- राजकीय पक्षांच्या व्यासपीठाशिवाय हा विचार कामगारांपर्यंत कसा पोहचविता येईल?

उत्तर :- वस्तुतः कामगार संघटनेचा आपला स्वतःचाच मंच असतो. भा.म.संघाने सिद्धांततःच राजकीय पक्षापासून अलिप्त राहण्याचे ठरविले आहे व ते प्रत्यक्षांत आणले आहे. इंटुक मध्येही एक मोठा गट हेच मानणारा आहे की कामगार संघटना ही राजकीय पक्षाची अंकित नसावी. हिंदुत्वाला स्वमताभिमान (डॉगम्याटिझम्) मान्य नाही. अर्थात् साम्यवादी संघटनांना या संबंधात विचार करण्याची गरज नसावी. कामगार संघटना ह राष्ट्रीयत्वाचा म्हणजेच भारतीयत्वाचा म्हणजेच हिंदुत्वाचा विचार त्यांच्या स्वतःच्या मंचावरूनच कामगारांपर्यंत पोहचवू शकतो. परमपूजनीय श्रीगुरूजींना अभिप्रेत ही शक्ती 'सत्ताबाह्य शक्तिकेंद्र' म्हणून देशाला उपयोगी होऊ शकते. हीच काळाची गरज आहे.

आज पाश्चिमात्य जग व साम्यवादी, विश्वशांतिसाठी अधिक योग्य जीवनप्रणाली व अर्थव्यवस्थांच्या शोधात आहेत. अशी व्यवस्था हिंदुसंस्कृतीच देऊ शकते हा आत्मविश्वास जागविण्याची आवश्यकता आहे.

(तरुण भारत नागपूर च्या प्रतिनिधीने
दि. १९ एप्रिल ९१ ला घेतलेल्या मुलाखतीच्या आधारे)

वादग्रस्त कामगार विधेयके

भारतीय कामगार संघटना कायदा १९२८ व औद्योगिक विवाद कायदा १९४७ या दोन कायद्यात आमूलाग्र बदल करणारे एक विधेयक केंद्र सरकारने तयार केले आहे. त्यातील काही तरतुदींच्या विरोधात कामगार संघटना दंड थोपटून उभ्या राहिल्या आहेत. त्यांनी आंदोलनाचा पवित्राही घेतला आहे. त्या सुधारणा विधेयकातील तरतुदींची सडेतोड चर्चा या लेखांत केली आहे. कामगार क्षेत्रांतील स्पंदने या लेखाद्वारे जाणवतील असा विश्वास वाटतो.

स्वातंत्र्यप्राप्तीनंतर उद्योगात झालेली प्रचंड वाढ. त्यावर मिळणारा प्रचंड नफा व बहुउद्देशीय कंपन्यांनी आपल्या देशात घातलेला धुडगुस यामुळे एकूणच कायद्याच्या स्व-स्तारात कामगार कायद्यांना महत्वाचे स्थान प्राप्त झाले होते. त्यात कामगारांनाही त्यांच्या हक्कांची वाढती जाण झाल्यामुळे स्वातंत्र्यप्राप्तीच्या सुमारास तयार झालेल्या या कायद्यांचा संदर्भच बदलला होता. कामगार कायद्यातील तरतुदीविषयी स्वाभाविकपणे आक्षेप घेऊ लागले आणि त्यातूनच औद्योगिक शांततेसाठी सर्वंकष कामगार कायदा असावा,अशी मागणी करण्यात येऊ लागली. त्या दृष्टीने शासनाने निश्चितपणे पाऊल उचलले पण त्यातील काही तरतुदी खरच फारच भयावह रूप घेऊन साकार झाल्या आहेत.

पूर्वेतिहास

हिंदुस्थानातील सर्वात पहिला कायदा १९२० साली ट्रेड डिस्प्युटस ॲक्ट हा होता. नंतर १९२६ साली इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट व वरील १९२० चा कायदा रद्द करून त्यी जागी ट्रेड डिस्प्युटस ॲक्ट १९२९ करण्यात आला. १९३८ मध्ये या कायद्यात दुरुस्ती करण्यात आली. परंतु दुसऱ्या महायुद्धाच्या काळात कडक शासकीय धोरण म्हणून डिफेन्स ऑफ इंडिया रूल्स शासनाने लागू केले. १ ऑक्टोबर १९४६ ला याची मुदत संपत आली असतांना [illegible] अध्यादेशाने याचे रूपांतर इमरजन्सी पॉवर्स (Continuance) रुल्स १९४६ असे करून तो लागू केला. साधारण त्याच सुमारास सरकारनी इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट स्टॅंडिंग ऑर्डर्स ॲक्ट १९४६ अमलात आणला. त्यावर केंद्रीय Central legislative असेम्ब्लीने ८ ऑक्टोबर १९४६ रोजी बिल [illegible] तेच विधेयक औद्योगिक विवाद अधिनियम १९४७ या नावाने मार्च १९४७

मध्ये अंमलात आले. या विधेयकात केंद्रीय शासनाने १९८१ पर्यंत एकंदर २९ वेळा ठळक अशा दुरुस्त्या केल्या आहेत. १९७८ व १९८२ मध्ये दुरुस्त्या केल्या आहेत. १९७८ व १९८२ मध्ये दुरुस्त्या सुचविणारे विधेयक संसदेत मांडले गेले होते परंतु देशभरातील प्रचंड विरोधामुळे ते बारगळले.

इंडियन ट्रेड युनियन ॲक्टमध्ये देखील १९६० व १९६४ साली काही दुरुस्त्या करण्यात आल्या होत्या.

ब्रिटिश राजवटीतील कायद्यांच्या काही तरतुदी

वरील विधेयके विशेषेकरून ब्रिटिश राज्यकाळातील असल्याने व स्वातंत्र्योत्तर जे विधेयक करण्यात आले त्यातील काही तरतुदींचा अभ्यास केल्यास एक विशेष सूत्र त्यात दिसते, ते पहाणेही मजेशीर व खरे पाहता खेदजनक दिसते.

१९२० च्या कायद्यांतर्गत उद्योगातील विवाद निपटविण्यासाठी चौकशी न्यायालय व समेट परिषद बोर्ड ची व्यवस्था होती. आवश्यक सेवांमध्ये १ महिन्याची पूर्वसूचना दिल्याशिवाय संप करण्यावर बंदी असून शासनाचा निर्णय अंमलात आणण्यासाठी देखील संपावर बंदी घालण्यात आली होती. दुसऱ्या उद्योगातील कामगारांच्या संपाला सहानुभूतीदर्शक संप, त्यांच्या मदतीसाठी निधी गोळा करणे यावरही बंदी होती. परंतु कामगार, मालकामधील विवाद मिटविण्याची त्यात व्यवस्था नव्हती. १९२९ च्या कायद्यान्वये सरकारला आवश्यक त्याप्रसंगी मालक-कामगार विवादात दखल देण्याचे अधिकार देण्यात आले. त्यातही संपविषयक भूमिकेत बदल केला नाही व समेट अधिकारी अमदीच अस्थायी स्वरूपाचे ठेवण्यात आले होते. पण त्यानंतर १९३८ मध्ये सर्वप्रथम समेट अधिकारी नियुक्त करण्याचे अधिकार राज्य व केंद्र सरकारला मिळाले. दुसऱ्या महायुद्धाचे वेळी डिफेन्स ऑफ इंडिया रुल्सचे अंतर्गत ब्रिटिश सरकारने दमनकारी अधिकार घेतले व ते वापरले, यांचा वेगळा इतिहास लिहिण्याचे कारण नसावे.

इंडियन ट्रेड युनियन ॲक्ट १९२६ व इंडस्ट्रियल एम्प्लॉयमेंट स्टॅंडिंग ऑर्डर्स् ॲक्ट १९४६ हे दोन्ही कायदे ब्रिटिशांच्या राज्यकालातच आले असले व त्याचे उद्देश काहीसे आजच्या कायद्यांना एक प्रकारे [illegible]

असले तरी त्यावेळी त्यांचा उपयोग गुलामांना अंकित करून ठेवण्याचाच होता, हेही विसरून चालणार नाही.

स्वातंत्र्योत्तर काळ

१९४७ च्या औद्योगिक विवाद अधिनियमाची उद्दिष्टये १९३६ च्या पहिल्या श्रम आयोगाच्या शिफारसीवर विशेषेकरून आधारित दिसतात. त्यांना समेटाची व्यवस्था, समेट अधिकाऱ्यांना मर्यादित अधिकार, वेज बोर्ड अनिवार्य, न्यायनिर्णयाची व्यवस्था, कामगार न्यायालयांची स्थापना, संप व टाळेबंदीवर समेट बोलणी चालू असताना बंदी, अशा तरतुदी करण्यात आल्या. १९२६ च्या कामगार संघटना कायद्याने व भारताच्या संविधानाने संघटनेचा हक्क हा मूलभूत हक्क स्वीकारल्यामुळे कामगार-मालक विवादात सामूहिक सौदेबाजीला एक विधायक स्वरूप दिले व औद्योगिक शांततेची हमी त्यात दृष्टिगोचर होती. यात अर्थात् संविधानानुसार कल्याणकारी राज्याकडे वाटचाल व्हावी व कामगारांचे जीवनस्तर सुधारण्याकडे समेटातून विवाद मिटवून प्रगती व्हावी, ही अपेक्षा होती. परंतु या दोन्ही कायद्यात काही मूलभूत अंतर्गत त्रुटी होत्या, त्यांचा आढावा थोडक्यात घ्यावा लागेल.

त्या त्रुटी

वरील दोन्ही कायद्यांची मुळे ब्रिटिश राज्यसत्तेच्या रचनेतील असल्याने नवभारत रचनेचा त्यात विचार संभवनीय नव्हताच. दुर्दैवाने स्वातंत्र्योत्तर काळात औद्योगिक दृष्टया प्रगतिशील हिंदुस्थानच्या पकृती, प्रवृत्ती विचारात न घेता जुनेच कायदे चालू ठेवले गेले व पूर्वीच्याच त्रुटी कायम आहेत. अर्थात् इंग्रजांच्या वारसाच पुढे चालू ठेवलेला आहे.

या कायद्याच्या व्याख्यांचा गोंधळही होताच. पण सर्वात महत्वाची एक त्रुटी म्हणजे संपविषयक चुकीच्या तरतुदी. अशी स्थिती आली की कायदेशीर संप कसा होऊ शकतो, हेच समजेनासे व्हावे. गो स्लो (मंदगती काम) व नियमानुसार काम यातील सूक्ष्म भेदही कोणी समजून घेतला नाही. आकस्मिक संप देखील अवैध ठरविले गेले. ही गोष्ट नमूद करण्यासारखी आहे की, मंदगती काम ही अप्रामाणिकता सूचक चळवळ आहे. हे सुप्रीम कोर्टाने म्हटले होते व [illegible] संघानेही स्पष्टपणे या गोष्टीचा विरोध केला होता. दुसरी महत्वाची त्रुटी व [illegible]

औद्योगिक शांततेच्या परिस्थितीला कारणीभूत आहे ती म्हणजे दोन्ही कायद्यात मालकांशी, सरकारशी (जेथे सरकारी उद्योग असेल तेथे) कामगारांचे प्रतिनिधित्व करून बोलणी करण्यासाठी मान्यतेच्या तरतुदीचा अभाव. मान्यतेचे कोणतेच निकष कायद्यात नव्हते. संसदेत रेल्वे उद्योगातील संघटनेला मान्यता देण्याबाबत काही निकष सांगितले गेले. परंतु शासनाने ते कधीच पाळले नाहीत. भाईभतिजा भूमिकेतून शासनकर्त्या राजकीय पक्षाच्या अंतर्गत कार्यरत कामगार संघटनांनाच केवळ मान्यता देण्यात आली. परिणामतः ज्या कामगार संघटनांचे बहुमत असते त्यांच्याशी साधी बोलणीही मालक किंवा सरकार करीत नाही. कित्येक वेळा अशी स्थिती दिसते की, कागदी मान्यता असलेल्या संघटनेने दिलेला संपाचा आदेश कामगार पाळत नाहीत, परंतु त्यांनी केलेले करार कामगारांवर लादले जातात. त्यातच राज्याराज्यांनी कामगारविषयक अनेक कायदे त्यांच्या राज्यापुरते लागू केले. त्यातूनही अनेक प्रश्न निर्माण झाले. १९६९ च्या राष्ट्रीय श्रम आयोगाच्या एका अभ्यास गटाने सर्व कायद्यांचे संहितीकरण करावे, अशी सूचना केली होती. ती अर्थातच शासनाने स्वीकारली नाही.

१९७१ नंतर शासनात एक हुकूमशाही प्रवृत्तीचा प्रादुर्भाव झाला व विद्यमान कायद्यांच्या त्रुटींचा गैरफायदा घेऊन शासनाने द्विपक्ष करारही रद्द केल्याची उदाहरणे आहेत. कोणताही विवाद न्यायालयाकडे सुपूर्द करण्याचे स्वेच्छाधिकार शासनाने स्वतःकडे ठेवले, ही तर आप-पर भावनेची कमाल मर्यादाच होती. यामुळे अनेक अन्यायग्रस्त कामगार न्यायापासून वंचित राहिले आहेत. कोणत्याही कामगाराला सरळ न्यायालयात जाण्याची तरतूदही या कायद्यात नव्हती. त्याचा गैरफायदा जसा शासनाने घेतला तसाच काही हुकूमशाहीची कामगार संघटनांनीही घेतला. नको असलेल्या कामगारांची प्रकरणे उपस्थित नाहीत, असा अनुभव कामगारांना येऊ लागला.

एका महत्वाच्या त्रुटीकडे लक्ष वेधून हा विषय पूर्ण करता येईल. सामूहिक सौदेबाजीचा मूळ आधार कामगार संघटना व [illegible] यांची आपसातील बोलणी करण्याची व्यवस्था, याच यंत्रणेत संपाचा [illegible] समाविष्ट असणे अपरिहार्य आहे. एका अर्थाने संपाचा अधिकार हा सामूहिक सौदेबाजीचा 'शांततेच्या काळातील' कणाच मानला पाहिजे. परंतु [illegible] तत्त्वाला अनुसरूनच स्वतंत्र कामगार चळवळ आवश्यक आहे. त्याबाबत [illegible]

कायद्यात काही निर्देश नाही. एक प्रकारे आजचे कायदे कोणाच्यातरी खुशामतीसाठी केले गेले असावेत, हेच दिसते. अलिकडील बहुउद्देशीय कंपन्यांना भारत सरकारने ज्या सवलती दिल्यात त्यातील अनेक अटीत एक अट असतेच असते की, बहुउद्देशीय उद्योगात कामगारांना संपाचा अधिकार नसावा. हीच भयानक दृष्टी आजच्या दुरुस्त्यामागे आहे, हे स्पष्ट आहे. मुद्रास्फिती, काळाबाजार, भ्रष्टाचार व अकर्मण्यता यांनी ग्रासलेल्या आजच्या सरकारला स्वतंत्र, लोकशाही तत्त्वावर आधारित, राजकारणातील कामगार संघटना अडचणीच्या झाल्या आहेत. म्हणूनच आजचे हे दुरुस्ती विधेयक आणले गेले, ही वस्तुस्थिती आहे.

दुरुस्ती विधेयक

१९२६ च्या कामगार संघटना कायद्यांतर्गत एका उद्योगातील कोणाही ७ व्यक्तींना कामगार संघटना स्थापन करण्याचा अधिकार आहे. सुधारणा विधेयकान्वये धारा ४ नुसार आता कोणत्याही एका उद्योगात किंवा उद्योग समूहात कामावर असलेल्या कामगार संख्येच्या एक दशांश संख्येइतक्या कामगारांना संघटना स्थापन करता येईल व विशेष म्हणजे हा कायदा अंमलात आल्यापासून सहा महिन्याचे आत सध्या अस्तित्वात असलेल्या संघटनांना त्या उद्योगातील एकूण कामगार संख्येच्या दहा टक्के इतके सदस्य असल्याने सदस्यपत्रक रजिस्ट्रारला सादर करावे लागेल. अन्यथा त्या संघटनेचे पंजीयन संपुष्टात येईल. १० टक्के बंधनामुळे जनरल संघटना अनेक ठिकाणी विस्तारलेल्या एकाच उद्योगाच्या किंवा समान उद्योगातील संघटना स्थापन करणे अशक्य आहे.

कामगार संघटनांचा बुजबुजाट झाला आहे, हे कारण यामागे दाखविण्यात आले आहे. हे कारण किती पोकळ आहे, हे लक्षात येण्यासाठी एकच उदाहरण देता येईल. रेल्वे किंवा मेल किंवा विद्युत मंडळासारख्या विस्तारलेल्या उद्योगात हे शक्य होईल काय, हे सहज कळण्यासारखे आहे. अर्थात वरील कारण हे खरे नसून कामगार संघटनाच नष्ट करण्याचा सरकारचा यात अंतस्थ हेतू आहे.

कामगारांच्या पगारातून परस्पर संघटनेची वर्गणी वसूल करण्याचे अधिकार देखील मालकांनी नियुक्त केलेल्या अधिकाऱ्यासमोर मी अमुक संघटनेचा सभासद आहे. असे लिहून दिल्यानंतर, कापून घेण्याची अफलातून कल्पना यात [illegible]

म्हणजे सरकार किंवा मालकधार्जिण्या कामगार संघटनेचाच सभासद व्हावे लागेल. याशिवाय कामगाराला गत्यंतर राहणार नाही. हे अधिकारपत्र मालकांना जपून ठेवावे लागणार आहे म्हणजे पुन्हा कामगार अंकित राहील.

या नवीन दुरूस्तीनुसार एक महत्वाचा बदल करण्यात आला आहे व तो म्हणजे बाहेरील नेतृत्वावर मर्यादा. केवळ बाहेरच्या दोनच व्यक्तींना कामगार संघटनेत राहता येणार आहे. आज प्रत्येकच संघटनेत संपूर्ण जीवनच कामगार चळवळीला वाहिलेले अनेक कार्यकर्ते व नेते आहेत. असेच कार्यकर्ते प्रामुख्याने त्या कामगार संघटनेचे नेतृत्व करतात. आज अधिकारांची व हक्कांची जाण मोठ्या प्रमाणात होऊनही मालकांच्या बरोबरीने किंवा शासनाच्या सेक्रेटरी स्तरावरील अधिकाऱ्यांशी समानतेच्या भूमिकेतून बोलण्याचे धाडस कामगारांत राहत नाही. तसेच कामगार प्रतिनिधीला बरोबरीच्या नात्याने वागविण्याची वृत्ती अधिकारमदाने किंवा धनाच्या गर्वाने किंवा राजकीय पदाच्या अहंकाराने अद्यापही रुजली नाही. एखाद्याने नोकरी सोडून संघटनेचेच पूर्णवेळ काम करतो म्हटले की, तो 'बाहेरचा' होणार. नागपुरात स्व. रुईकर, सर्वश्री दत्तोपंत ठेंगडी, धाबेजी, स्व. काशीकर, वसंतराव लुले, बर्धन, तिडके, हरिभाऊ नाईक, कश्यप व स्वतः लेखकही या कायद्यानुसार बाहेरचे ठरून संघटनेतून हद्दपार होतील. हे निरोगी कामगार चळवळीला पोषक असे ठरणार नाही. त्याच उद्योगातील कामगारांनी स्वतःचे नेतृत्व करावे, ही एक आदर्शवत् स्थिती आहे. ती यावी असे भारतीय मजदूर संघालाही वाटते पण ती आदर्शवत् स्थिती यायला अजून बराच काळ लोटावा लागणार आहे.

अशी ही दिशाभूल

या कायद्यात जनतेची थोडीफार दिशाभूल करण्यासाठी एक मजेशीर सुधारणा करण्यात आली आहे. "कोणाही केंद्रीय व राज्यातील मंत्र्याला कामगार संघटनेचा पदाधिकारी होता येणार नाही", यावर कोणतेही भाष्य करण्याची गरज नाही.

कामगार संघटना विषयक कायद्याची माहिती करून घेतल्यावर आता औद्योगिक अधिनियमाकडे वळू या. आता यातील विवाद लुप्त होणार आहे. हे विधेयक औद्योगिक संबंध अधिनियम १९८८ म्हणून ओळखले जाणार आहे. या कायद्याची अंमलबजावणी करणारी यंत्रणाही बदलली जाणार आहे.

-या कायद्यात प्रकरण २- सी हे नव्याने समाविष्ट करण्यात येत आहे. त्यानुसार एक सेंट्रल इंडस्ट्रियल कमिशन नियुक्त करण्यात येणार आहे. राज्यस्तरावरही असेच आयोग राहणार आहे. त्यावर एक न्यायाधीश व तज्ज्ञ सदस्य नेमले जाणार आहेत. तज्ज्ञ सदस्य नेमण्याचा अधिकार अर्थातच शासनाने स्वतःकडे ठेवला आहे. सामान्यतः अशा नियुक्त्यात घशिलेबाजीची बीजे असतात. हा एक प्रघात झाला आहे.

राष्ट्रीय पातळीवरील विवादासाठी एक खास औद्योगिक मंडळ राहणार आहे. त्याच्या निर्णयावर फक्त सर्वोच्च न्यायालयातचअपील करता येणार आहे. हा प्रकारही वेळ काढूपणाचा अन् खर्चाचा राहणार आहे, हे सांगणे न लगे.

विद्यमान कायद्याप्रमाणेच अंतरिम राहतचा अधिकारही न्यायाधिकारणाला दिलेला आहे. जुन्या मध्यप्रांतात त्यावेळी लागू असलेल्या सी.पी. ॲण्ड बेरार इंडस्ट्रियल डिस्प्युटस ॲक्ट १९४७ च्या कलम - १६ प्रमाणे अन्याय झालेल्या कामगाराला सरळ व्यक्तिशः असिस्टंट लेबर कमिश्नरकडे दावा दाखल करता येत असे. तशीच चांगली सोय कलम -२ (अ) मध्ये करण्यात येत आहे. बडतर्फी, निष्कासन, कामावरून कमी करणे प्रकरणात वैयक्तिक[illegible] खटला दाखल करता येणार आहे. परिणामतः सरकारला किंवा [illegible] प्रवृत्तीच्या कामगार संघटनेला एखादे प्रकरण न्यायप्रविष्ट करण्याचा [illegible] स्वेच्छाधिकार आहे त्यावर निश्चितपणाने बंधने येतील. हे एक चांगले कलम आहे.

सार्वजनिक उपयुक्तता सेवा

सार्वजनिक उपयुक्तता सेवेची मर्यादा नवीन व्याख्येनुसार [illegible] वाढविण्यात आली आहे सामान्य माणसाच्या जीवनाशी संबंधित अशा [illegible] व्यवसायाचा यात समावेश होऊ शकतो व त्या ठिकाणी सरसकट [illegible] याचा अर्थ सरळसरळ कामगाराची मुस्कटदाबी असाच ठरू शकतो. अशा उद्योगांची संख्या सध्या ३१ एवढी दाखविण्यात आली आहे.

सौदा समिती

प्रकरण 2 - डी नुसार सौदा समित्या स्थापन करण्यात येणार आहेत. [illegible] एका चांगल्या शास्त्रशुद्ध मागणीची भ्रष्ट नक्कल आहे. या सौदा समित्या [illegible]

करण्याची जबाबदारी मालकांवर टाकण्यात आली आहे. उद्योगात एकापेक्षा अधिक कामगार संघटना असतील तर त्यांना सदस्य संख्येच्या प्रमाणात या समितीवर प्रतिनिधित्व देण्यात येणार आहे. मात्र त्या उद्योगातील ४० टक्के पेक्षा अधिक सदस्य असलेल्या संघटनेला मुख्य प्रतिनिधी म्हटले जाईल. एकच समिती असेल तर ती प्रमुख प्रतिनिधी राहील. सरकारी उद्योगात अशी समिती केंद्र किंवा राज्य सरकार स्थापन करणार आहे. या समितीची नोंदणी कामगार न्यायालयात तीन वर्षाच्या कालावधीकरिता केली जाणार आहे.

१९६९ पासून ही मागणी भारतीय मजदूर संघ करीत आहे. ती अधिक शास्त्रशुद्ध होती. त्यानुसार जे कामगार कोणत्याही एका संघटनेचे लागोपाठ तीन वर्षे सदस्य असतील. अशांचा मतदारसंघ स्थापून त्यातून गुप्त मतदान पद्धतीने प्रतिनिधीची निवडणूक होऊन मिळालेल्या मतांच्या प्रमाणात सौदा समितीवर सदस्य नियुक्त व्हावेत. पण ही मागणी पाहिजे त्या स्वरूपात मान्य झाली नाही. या प्रस्तावित सौदा समितीच्या गठनात धोके फार आहेत. एकतर मतदारसंघ कसा असावा याची स्पष्टता नसल्याने व आजमितीला 'सदस्य' नसलेल्या कामगारांची संख्या फार मोठी असल्याने ही समिती तयार करणे अशक्यप्राय होणार आहे. शिवाय पदाधिकाऱ्यांची निवड प्रतिनिधींनी करावयाची असल्याने त्यांची आपापसात भांडणेच जास्ती वाढणार आहेत. मूळ प्रश्न त्या भांडणातून बाहेरच बाजूला राहणार आहे. कलम ९ - झेड्नुसार या सौदा समिती नष्ट करण्याचा अधिकार न्यायाधिकरणाला दिला आहे. एखादा सभासद बेकायदेशीर संपात भाग घेत असेल किंवा संपाला सहाय्य करीत असेल तर ही समितीच रद्दबातल ठरू शकते. संपूर्ण कामगार आंदोलनच यामुळे संपुष्टात येण्याचा धोका निर्माण झाला आहे.

अप्रत्यक्ष संपबंदी

संपाचा निर्णय घ्यायचा झाला तर आता बहुमताचा कौल घेतला जाणार. बहुमताने कौल दिला तरच संप करता येतो. नवीन सुधारणेत ७५ टक्के मतदान संपाच्या बाजूने झाले तरच संप पुकारण्याचा अधिकार कामगार संघटनेला प्राप्त होणार आहे. ७५ टक्के मतदान ही अट कामगार संघटनांना फारच जाचक ठरण्याची शक्यता आहे.

सेवा शर्तीवर बंधने घालण्याची तरतूद फारच भयावह आहे. कलम १० - ब अन्वये शासनाला जनतेच्या सुरक्षिततेसाठी सोयीखाली किंवा सामाजिक शांततेकरिता खास अध्यादेशाद्वारे विशिष्ट काळासाठी सेवाशर्तीवर बंधने घालता येतील. विशिष्ट उद्योगात संपबंदीही शासनाला करता येणार आहे. अर्थात कामाच्या वेळात बदल करणे, रजा नामंजूर करणे, भत्ते गोठवणे इत्यादी सेवाशर्ती बदलवणे हे पूर्णपणे हुकूमशाहीच आणण्याचे लक्षण मानावे लागेल. विधेयकातली दंड विधानही असेच निष्फळ आहे.

संपबंदी

संपबंदी हे या विधेयकाचे खास वैशिष्टय आहे. कोणतीही कामगार संघटना ही शौकासाठी कधीही संप करीत नाही. नेत्याची हौस म्हणूनही कोणताही संप नाही. लोकशाही संकेत धुडकावून जेव्हा शासनकर्ते बहुमताचा आदर करीत नाहीत, मालकांच्या युक्त्यांना स्वतःची खुर्ची शाबूत ठेवण्यासाठी समर्थन देतात. राजकीय कारणासाठी, आपल्या संघटनेची मान्यता कायम ठेवण्यासाठी विरोधी समजल्या जाणाऱ्या कामगार संघटनांच्या मागण्या ठुकरावतात आणि अन्यायाचे परिमार्जन करण्याचे सर्व रस्ते बंद होतात तेव्हाच हे हत्यार उपसले जाते. कामगार, शिक्षक, डॉक्टर, पत्रकार, आवश्यक सेवेतील कर्मचारीच नव्हे तर कधीही न्यायाधीशांनाही संपाचे आंदोलनाचे मार्ग चोखाळावे लागतात. ही आपली राजकीय शांतिक्रांति आहे. संप हा कामगारांचा मूलभूत हक्क आहे. त्यावर बंदी हे हुकूमशाहीचे द्योतक आहे. हे लोकशाहीचे जनक समजल्या जाणाऱ्या इंगलंडनेही मान्य केले आहे. अशा स्थितीत मान झुकवून अशी संप बंदी कधीही कामगार संघटना करणार नाहीत. लढाऊ वृत्तीची जागा उद्दाम उर्मटपणाने घ्यावी, असे वाटत असेल तर शासनाने संपावर खुशाल बंदी आणावी. त्याचे परिणाम आपल्या सर्वांनाच भोगावे लागतील.

दवाखाने व इतर संस्था यातील कामगारांनी गैरकायदेशीर संपात भाग घेतल्यास किंवा डायरेक्ट ॲक्शनमध्ये भाग घेतला तर त्याला १ ते ६ महिने कारावास, १० ते २० हजार रुपये दंड अशा शिक्षा सुचविण्यात आल्या आहेत. आमच्या देशात भ्रष्टाचारी मोकाट सुटले आहेत परंतु न्याय्य मागण्यांसाठी शांततापूर्ण निदर्शने करणाऱ्यांना कारावास हेच काय ते आम्हाला अभिप्रेत असलेले स्वराज्य आहे.

वस्तुतः आमच्या देशातील परिस्थिती, उत्पादन क्षमता, मनुष्यबळ, कामगारांची अन् सर्वच समाजाची कामाशी असणारी सांस्कृतिक तन्मयता, न्याय व्यवस्थेच्या परंपरागत कल्पना या सर्वांचा सर्वंकष विचार करून राष्ट्रीय निर्मितीसाठी एक सर्वस्पर्शी कामगार कायदा तयार व्हायला हवा. विद्यमान राजकीय पक्ष कधीही हे कार्य करू शकणार नाही. अशा वेळी जबाबदार कामगार संघटनांनी या दिशेने प्रयत्न करायला हवा. असा प्रयास होईस्तोवर तूर्तास हा काळा कायदा हाणून पाडणे, हाच एकमेव मार्ग सर्व कामगार संघटनांना अमंलात आणावा लागणार आहे.

व्यसनमुक्ती : कामगार संघटनांची जबाबदारी

आपल्या देशाच्या औद्योगिक व आर्थिक व्यवस्थेत कामगार संघटनांना अनन्यसाधारण महत्व प्राप्त झाले आहे. विशेषकरून संघटित कामगार क्षेत्रात संघटनांच्या प्रयत्नामुळे कामाच्या तासांचे निर्धारण व वेतनमान उंचावणे या उपलब्धीमुळे कामगार संघटनांना एक विशेष स्थान उपलब्ध झाले आहे. मात्र अलीकडे कामगार' हा केवळ स्वतःच्या मागण्या पदरात पाडून घेण्याकरिता समाजाला वेठीस धरतो व उत्पादनाकडे दुर्लक्ष करतो. तो दुर्व्यसनग्रस्त होत आहे, असेही आढळते. ही दुर्दैवाची बाब आहे म्हणून ह्या लेखाच्या विषयाच्या संदर्भात कामगारांच्या स्थितीविषयी परीक्षण करणे आवश्यक ठरावे.

कामगार संघटनांची आरंभाची उद्दिष्ट्ये

सुरूवातीला कामाचे तास निर्धारित करणे व वेतनमान सुधारणे ही दोन उद्दिष्ट्ये समोर होती. त्यानंतर सेवाशर्तीत सुधारणा व रोटी-कपडा-मकान ही उद्दिष्ट्ये समाविष्ट झालीत. परंतु परकीय राज्यकर्ते व मुनाफाखोर उद्योगपती हयांनी कामगारांचे शोषण चालूच ठेवले होते. त्याविरूद्ध 'शोषण मुक्ती'साठी कामगार संघटनांना प्रखर लढे द्यावे लागले. याचवेळी साम्यवादी तत्त्वप्रणालीने कामगार चळवळीत प्रवेश केला व केवळ भौतिक उन्नती पुरतीच कामगार चळवळ मर्यादित ठेवली. खऱ्या कामगार हिताच्या दृष्टीऐवजी राजकीय दृष्टी या चळवळीला दिली गेली. कामगार संघटनांना केवळ राजकीय हित साध्य करण्याचे साधन म्हणून वापरले जाऊ लागले. साम्यवाद्यांनी या चळवळीत वर्ग कलहाचे बीजारोपण केले भौतिक उन्नतीचे गोंडस चित्र समोर ठेवून त्यांनी कामगारांच्या सर्वांगीण उन्नतीचे ध्येय दुर्लक्षित केले, 'अपूर्ण' असलेली भौतिक सुख मिळविण्यापुरतीच ही चळवळ मर्यादित ठेवली.

महात्माजींच्या राजकारण प्रवेशानंतर कामगार चळवळीला 'विश्वस्त कल्पनेचा' नवा आयाम मिळाला. परंतु उद्योगपती व विदेशी शासनकर्ते यांनी ही भूमिका कधीच रुजू दिली नाही. 'इंटुक' या काँग्रेसप्रणीत कामगार संघटनेने ही

भूमिका उचलून धरली व 'वर्ग कलह' न मानता 'वर्ग समन्वय' हा सिद्धांत मांडला. परंतु येथेही वर्ग संघर्षाचे वातावरण कायम राहिले. ही चळवळ राजकीय पक्षांशीच बांधलेली राहिली. अर्थात राजकीय उद्दिष्ट्येच कामगार संघटनेसमोर राहिलीत. भारतीय मजदूर संघाने वरील दोन्ही संघटनांपेक्षा स्पष्टपणे वेगळे तत्वज्ञान या चळवळीला दिले. राष्ट्रहित व उद्योगहितांच्या चौकटीतच कामगारहित अंतर्भूत आहे व कामगार हा समाजापासून वेगळे अस्तित्व असलेला घटक नाही. हे सिद्धांतरूपाने मांडले. वरील तीन संघटनाशिवाय अन्य संघटनांचा विचार करण्याचे कारण नाही. कारण त्या सर्व आयटुक व इंटुकचीच फुटीर अंगे आहेत - असे म्हटल्यास वावगे नाही.

जीवनस्तर उंचावणे यांत मानसिक उन्नयन अंतर्भूत असावे :

केवळ भौतिक उन्नतीचे उद्दिष्ट्य कामगार चळवळीपुढे राहिल्याने तसेच केवळ राजकीय पक्षांचे ध्येय साध्य करण्याचे साधन म्हणून कामगार संघटनांचा उपयोग केला गेल्याने कामगारांच्या मानसिक उन्नयनाचा विचार यात आला नाही. हक्काच्या जाणीवेवरोबर कर्तव्याचे शिक्षण देण्याचे उद्दिष्ट्य समोरच आले नाही. उत्पादकता हा शारीरिक क्षमतेबरोबरच मानसिक प्रक्रियेचा अनिवार्य परिणाम आहे, याकडे दुर्लक्ष केले गेले. कामगार हा यंत्राचा केवळ एक 'पुर्जा' नसून ती एक चेतनशक्ती आहे याचे भान ठेवले गेले नाही. त्यांच्या अंगचा आत्मविश्वास व गुणांची नीट जोपासना केली गेली तर, देशाच्या सर्वांगीण विकासात तो एक खरोखर महत्वाचा घटक सिद्ध होऊ शकतो. तो राष्ट्राच्या एकूण संपत्तीत सन्मानीय भागीदार होऊ शकतो.

ह्यासाठीच कामगारांचे मानसिक उन्नयनाचा हेतू समोर ठेवणे आवश्यक आहे. कामगारांचे जीवनस्तर उंचावणे हे ध्येय वास्तविक कामगार संघटनेचे मानले गेले आहे परंतु त्याचा संकोच होऊन केवळ वेतनमान उंचावणे इतक्या पुरतीच ही चळवळ राबविली गेली, असे दिसते.

काही विद्यमान कायदे व त्यातील तरतुदी :-

फॅक्टरी ॲक्ट, माईन्स ॲक्ट, चाईल्ड लेबर ॲक्ट इत्यादी काही कायद्यां मुळे सुरक्षा व स्वास्थ्य याबाबत कलमे आहेत. परंतु त्यातही कामगारांच्या मानसिक स्वास्थ्याचा विचार होत नाही. भारताच्या संविधानात कल्याणकारी राज्याचे अंगीकार

उदात्त कल्पना मांडली आहे. परंतु दुर्दैवाने अनियंत्रित अर्थसंचय व अपूर्ण काम (मागण्या) यावर राष्ट्रधर्माचे बंधन असले पाहिजे. या नीतीचा त्यांत भास दिसत नाही. भरमसाट अर्थोत्पादन व अनियंत्रित सुखोपभोग हीच जणू काही जीवनाची अंतिम ध्येये मानली गेली. कामगारांनी केलेले अधिकांश संप हे अधिकाधिक वेतन, अधिक वोनस, जास्त महागाई भत्ते यासाठीच झालेले दिसतात. शासनाने प्रोत्साहन म्हणून जी पारितोषिके दिली ती देखील पैशाच्या रूपातच (वार्षिक वाढ) दिली. व्यवस्थापनात सहभाग या कल्पनेलाही 'व्यवस्थापनापुरतीच' मर्यादा आहे. कामगार हा उद्योगाच्या मालकी हक्कांचा घटक आहे ही भावना त्यात नाही. म्हणजे एका अर्थाने तो भाडयाच्या घरात राहणाऱ्या मनुष्यासारखाच उद्योगात परका मानला जातो. या सर्व व्यवस्थेचा हवे तर दुर्व्यवस्थेचा परिणाम एकच झाला. म्हणजे कामगार स्वयंकेंद्रित झाला व स्वतःच्या सुखामागेच तो लागला. यातून तो दुर्व्यसनाधीन न झाला तरच नवल!

गेल्या दहा वर्षातील दिशा :-

गेल्या काही वर्षात कामगार क्षेत्र रोगट होत चालल्याची जाणीव इंटुक व भा. मं. संघ यांच्या तत्त्वज्ञानामुळे झालेली आहे. इंटुकने आता 'राष्ट्रहित सर्वतोपरी' ही भूमिका स्पष्टपणे घेतली आहे. 'श्रमएवं जयते' हे ब्रीदवाक्य शासनाने अंगीकारले आहे. केंद्रीय कामगार शिक्षण मंडळाने काही वर्षापूर्वी पाठ्यक्रमात महत्वाचे बदल केले आहेत. त्यात राष्ट्रहित सर्वतोपरी उद्योग व कामगारहित [illegible] कामगार संघटना व त्यांचा परिवार यात कामगारांची बांधिलकी हे ध्येय [illegible] मंडळाने प्रकाशित केलेल्या 'शिक्षण साहित्य' पुस्तकात कामगारांची गुणात्मक वाढ व धूम्रपान इत्यादी अपप्रवृत्तीचा नायनाट या विषयांचा समावेश केला आहे.

कामगार संघटनांची जबाबदारी :-

रोगट होत चाललेल्या कामगार चळवळीत परिवर्तन आणणे ही जबाबदारी प्रामुख्याने कामगार संघटनेची असलीच पाहिजे. आपल्या देशाच्या [illegible] सांगणारे तत्त्वज्ञान असलेल्या कामगार संघटनाच हे परिवर्तन घडवून [illegible] शकतात. कामगारांना प्रशिक्षित करावे लागेल. त्यासाठी कामगारांसमोर [illegible] ध्येय ठेवावे लागेल. व्यक्तिगत चारित्र्य व सामाजिक चारित्र्य हा [illegible] नाण्याच्या दोन बाजू आहेत. ही शिकवण द्यावी लागेल. केवळ कायद्याने मनुष्य नीतिमान होऊ शकत नाही. कायद्याने दारूबंदी करून किंवा शासकीय [illegible]

धूम्रपान बंदी करून तसेच यातून होणाऱ्या दुष्परिणामांची दूरदर्शनवर चित्रे दाखवून चारित्र्य घडणार नाही. याचे महत्व कमी नाही हे मान्य करूनही हे उपाय पुरेसे नाहीत असे म्हणण्याचा हेतू आहे. नैतिक शिक्षणाची जबाबदारी घ्यावी लागेल. शाश्वत मूल्ये मनावर बिंबविणारे ग्रंथ कामगारांपर्यंत पोचवावे लागतील. सहज चाळता चाळता समर्थांची एक ओवी आढळली - 'धूम्रपान घेऊ नये। उन्मत्त द्रव्य सेवू नये। करू नये मैत्रीकदा।। (दासबोध)। मद्यपान, परस्त्री, परधनाची अभिलाषा व जीवहत्या ही महापातके मानली आहेत. ही जाणीव सर्वांना द्यावी लागेल. पापपुण्याची कल्पना कोणाला बुरसटलेली वाटेल परंतु यामुळेच शेकडो वर्ष समाज गुन्हेगारी प्रवृत्तीच्या कल्पनेपासून दूर राहिला, हे मान्य करावेच लागेल. दंडशक्ती व सज्जनशक्तीवर आलेली ग्लानी हे देखील दुर्व्यसनाचा प्रादुर्भाव होण्यास कारणीभूत झाले असेल. मी असे ऐकले आहे की मुंबईत इंटुक संलग्न काही संघटनांमध्ये दुर्व्यसनाधीन कामगारांना युनियनच्या कार्यकारी मंडळात स्थान दिले जात नाही. भा. म. सं. च्या एका संघटनेने मद्यपान केलेल्या ड्रायव्हरकडून बसला अपघात झाल्यास, त्याचा परवाना रद्द करावा, असा प्रस्ताव केला आहे.

इतर संस्थांची जबाबदारी :-

राजकीय पक्ष हे कार्य करू शकणार नाही, अशी साधारण खात्रीच वाटते. पैसा मिळविण्यासाठी सर्व वैध, अवैध मार्गांचा अवलंब राजकीय पक्ष करीत असतात, हे उघड गुपित आहे. सत्ताधारी पक्ष तर दारू दुकानाचे परवाने लिलावाने विकून लक्षावधी रुपये मिळवितात. हे थांबले पाहिजे. समाज परिवर्तनाचा ठेका एकट्या कामगार संघटनेकडे देऊन चालणार नाही. कामगार संघटनांनी लढे देऊन कामगारांना मिळवून दिलेल्या वाढीव वेतनाचा विनियोग हे योग्य कामासाठी करतात, दुर्व्यसनात खर्च करीत नाहीत, हे पाहण्याची जबाबदारी कामगार संघटनेची आहे.

मात्र यात शासनासहित सर्व सामाजिक संस्थांचे सहकार्य अपेक्षित हवे. शेवटी एक त्रिकालाबाधित सिद्धांत समोर ठेवला पाहिजे की - "यद् यद् आचरति श्रेष्ठः तदुतदेवेतरो जनः". जर्मन भाषेतील एका म्हणीचे इंग्रजी भाषांतर असे आहे - Fish rots from the head!

श्रमिकीकरण

भारतीय मजदूर संघाच्या स्थापनेची मुख्यतः तीन उद्दष्टिये मांडली गेली होती. श्रमिकांचे भारतीयकरण, भारताचे औद्योगीकरण व उद्योगांचे श्रमिकीकरण या मागची पृष्ठभूमी अशी असावी. दोन-तीनशे वर्षांपूर्वी औद्योगीकरणाची जी प्रक्रिया वेगाने सुरू झाली त्यातून पूंजीवाद व साम्यवाद ही तत्त्वे प्रतिक्रियारूपाने उदयाला आली. दोन्ही तत्त्वप्रणालींमध्ये कामगारांचे शोषण नष्ट होण्याची घोषणा असली तरी त्या प्रणालीतील अंतर्गत वैचारिक विरोधामुळे व्यवहारात कामगारांचे शोषण नष्ट होऊ शकले नाही. पाश्चिमात्य जगात औद्योगीकरणाच्या आरंभाच्या काळात क्रूर राजेशाही देखील शोषण करणारीच होती. इंग्लंडमध्ये मेरी किंवा फ्रान्समध्ये १४ वा लुई, अमेरिकेतील गुलामगिरी ही उदाहरणे या काळात सर्वज्ञात आहेतच. यातूनच समता, बंधुता, लोकशाही इ. तत्त्वे जन्म पावली. इंग्लंडमधील मॅग्नाकार्टा, फ्रेंच राज्यक्रांती, १८८३ मधील अब्राहम लिंकनने केलेली लोकशाहीची व्याख्या याच प्रतिक्रियेतून जन्माला आलेली आहेत. या जागतिक वैचारिक परिवर्तनाचे परिणाम औद्योगिक क्षेत्रातही उमटले नसते तर आश्चर्य.

यांत्रिकीकरणाने प्रचंड प्रमाणावर उत्पादन होते व त्यातून तसाच प्रचंड मुनाफाही होतो, याचा स्वाभाविक लाभ उद्योगपतींनी घेतला व त्यातूनच मुनाफाखोरी अर्थात कामगारांकडून यंत्राप्रमाणेच काम घेऊन त्यांचे शोषण सुरू झाले. कामगार हा यंत्राचा निव्वळ एक निर्जीव पुर्जा (भाग) म्हणून त्याकडे बघण्याची वृत्ती [illegible] व सक्तीचे काम, वेठबिगारी, गुलामीच्या स्वरूपात कामगारांचे स्थान [illegible]. उत्पादनाची साधने व उत्पादित मालाचे वितरण या दोन्हीवर उद्योगपतींनी पूर्ण [illegible] घेतला अर्थात आर्थिक सिद्धांताला धरून हया उद्योगपतींनी अनिर्बंध [illegible] मिळविण्यासाठी अनिर्बंध शोषणही चालू राहावे, म्हणून सत्तेवरही [illegible] मिळविण्याचे प्रयत्न केले व त्यातूनच पुंजीवादी शासनाची निर्मिती [illegible]. राजकीय क्षेत्रात राजेशाहीची जागा, समंजस हुकूमशाही, लोकनियुक्त प्रतिनिधीद्वारे संचालित लोकशाहींनी घेतली. त्याच धर्तीवर कामगार [illegible] प्रक्रिया सुरू झाली व कामगारांना संघटनेचा अधिकार व पुढे [illegible] व्यवस्थापनात सहभाग ही तत्त्वे निर्माण झाली. त्यानुरुप कायदे इ. [illegible] दिसतात.

राज्यसत्ता लोकप्रतिनिधींचे हाती घेण्याच्या प्रक्रियेलाच प्रचलित शब्द लोकशाही दिसतो व कदाचित् सर्वप्रथम लोकशाहीची व्याख्या अब्राहम लिंकनने केली ती अशी की - ऑफ द पीपल, बाय द पीपल अँड फॉर द पीपल - लोकांचे, लोकांनी चालविलेले व लोकांकरिता चालविलेले राज्य "सर्व मानव जन्मतः समान आहेत व त्यांना काही मूलभूत हक्क निर्मात्याने दिले आहेत." ह्या तत्त्वाचा जगभर फार प्रभाव पडला व साधारण १० वर्षांनंतरच फ्रेंच राज्यक्रांती झाली. व्हाल्टेर, रुसो इ. नी बुद्धिवादाचा पुरस्कार केला तर मॉंटेडयूने कायदे करण्याची सत्ता, शासन करण्याची (शिक्षा करण्याची सत्ता) व न्याय देण्याची सत्ता या तीन स्वतंत्र मंडळांच्या हाती असाव्या असा सत्तेच्या विभाजनाचा सिद्धांत मांडला. स्वातंत्र्य-समानता-बंधुता ही तत्त्वे या क्रांतीने जगाला दिली. औद्योगीकरणाच्या शोषणाचा परिणाम आर्थिक - कामगार क्षेत्रातही झाला व वरील धर्तीवरच उत्पादनाची साधने व वितरणाची साधने ही एका व्यक्तीच्या हातातून काढून सत्ताधिष्ठितांच्या हातात देण्याचे तत्त्वज्ञान - सामान्यपणे साम्यवादी पद्धती म्हणून ओळखल्या जाणाऱ्या प्रक्रियेत रूपांतरित झाली. फ्रेंच क्रांतीनंतर सुमारे १००-१२५ वर्षांनी रशियन क्रांती झाली. त्याचा इतिहास लिहिण्याची गरज नाही.

ह्या सर्व विवेचनाचा हेतू हा की औद्योगिक क्षेत्रातील गुलामी व कामगारांचे भयानक शोषण थांबविण्याच्या प्रक्रियेला जगभर पर्यायी शोधणे सुरू झाले व आजही शोध चालू आहे. या प्रक्रियेत गुलामांना थोडा विरंगुळा व कौटुंबिक अधिकार देणे, गुलामांच्या विक्रीवर बंदीचे कायदे, इंग्लंडमधील ट्रेड गिल्डस् कामगारांच्या संघटनेचा अधिकार, कामगारांनी एकत्र येऊन मालकांविरुद्ध केलेले आरोप, पिनल कोडमधून अपवाद संघटनेच्या प्रतिनिधींशी कामगार प्रश्नावर वाटाघाटी - विशिष्ट कामगार संख्येच्या संघटनेला [illegible] दर्जा देणे - सामूहिक सौदेबाजीचा अधिकार - संपाला कायदेशीर मान्यता व [illegible] अतिशय बोलबाला होत असलेल्या व्यवस्थापनात कामगारांचे सहभाग, अशी ही उद्योगाच्या लोकशाहीकडे जाण्याची वाटचाल सुरू आहे.

उद्योगाचे स्वामित्व एकाच व्यक्तीकडे असल्याने शोषणही भयंकर [illegible] याला पर्याय म्हणून उद्योगाचे स्वामित्व सरकारकडे देणे हा एकमात्र [illegible] सुचविण्यात आला पण कालौघात अपयशी ठरला. या लोकशाही [illegible] उद्योगाच्या स्वामित्वाचेही या शतकात अनेक प्रकार झाले. सहकारी मालकीचे

उद्योग, सरकारी उद्योग - पब्लिक अंडरटेकिंग - कॉर्पोरेशन्स व आता बहुराष्ट्रीय कंपन्यांची मालकी व त्याचबरोबर सर्व जगभर उद्योगांचे - लोकशाहीकरण करण्याची लाट उठली आहे व प्रत्येक देशात या विषयी सुरू असलेले प्रयोग पाहणे उद्बोधक ठरावे. फ्रान्समध्ये १०० पेक्षा जास्त कामगार असलेल्या उद्योगांना नफ्याचा समान हिस्सा कामगारांत वितरित करण्याचा कायदा करण्यात आला आहे. युगोस्लाव्हियात स्वयं व्यवस्थापनाचे तंत्र अवलंबिण्यात आले. देशाच्या संयोजनांतर्गत कामगारांना आर्थिक व्यवस्थापनाचे स्वअधिकार दिले आहेत. हा प्रयोग हंगेरीत यशस्वी सिद्ध झाल्याचे सांगण्यात येते. इंग्लंडमध्ये ब्रिटिश ट्रेड युनियनला सर्वस्तरावर व्यवस्थापनात सहभागी करण्यात आले आहे. सिंगापूरमध्ये सहकारी तत्त्वावर वाहतूक उद्योग चालू आहे. चीनमध्ये वास्तववादी भूमिकेतून प्रयोग सुरू आहेत. पश्चिम जर्मनीत सहनिर्णयाचा कायदा (Co determination) कोळसा व पोलाद उद्योगात लागू असून या तत्त्वाचा विस्तार करून संचालक मंडळात कामगार (काही उद्योगात) प्रतिनिधी म्हणून घेण्यात आली व त्याच्या कार्यकक्षा कामगार कायदेविषयक धोरण ठरविणे, अशा ठरविण्यात आल्या आहेत पण हा कायदा देखील काही विशिष्ट आर्थिक उद्योगांना लागू आहे. स्वित्झर्लंड व स्वीडन या देशातही थोडयाफार भेदाने अशाच व्यवस्था दिसतात. जपानमध्ये काहीशी निराळी परंतु आपल्या देशाच्या परंपरांशी जवळीक साधणारी योजना अंमलात आहे. तेथील प्रत्येक उद्योगाचा मालक उद्योगपती आहे, सरकार असो किंवा कंपनी असो यांना कामगारांचे कायद्यामार्फत "पितृत्व स्वीकारावे लागते!" एखादा कामगार सेवेत समाविष्ट झाल्यापासून [illegible] व नंतर त्याच्या मृत्यूपर्यंत त्याचा सांभाळ करण्याची जबाबदारी त्या [illegible] टाकण्यात आली आहे. या पॅटर्नलायझेशनच्या योजनेमुळे कामगारांच्या मनात [illegible] जिव्हाळा निर्माण होऊन त्याची कर्मनिष्ठा वाढीस लागली. परिणामतः [illegible] गुणवत्ता व उत्पादन दोन्ही बाबतीत जपानने आज उच्चांक गाठला [illegible] जपानमधील कामगारांच्या शोषणाला आळा बसलेला दिसतो. अर्थात् [illegible] केले पाहिजे की जपानी लोकांची प्रखर राष्ट्रनिष्ठा व परंपरा टिकवून [illegible] आग्रह या दोन्ही गोष्टी जपानच्या आर्थिक उन्नतीला मूलतः कारणीभूत [illegible] मजेची गोष्ट अशी की, जपानमध्ये कामगार संघटनांनी ठराव करण्याचा [illegible] परंतु जपान सरकारने या संघटनांचे कठोरपणे दमन केले याला कारण ते [illegible]

संघटनांमध्ये साम्यवाद्यांनी घुसपैठ करून जपानची परंपरागत जीवनमूल्ये व राष्ट्रनिष्ठा यावरच आघात करणे सुरू केले हे होय, असे नमूद आहे.

जस्टिस कृष्णा अय्यर यांनी एका परिसंवादातील भाषणात संपूर्ण प्रयोगांचा उहापोह केलेला आहे. परंतु त्यांचा दृष्टिकोन काहीसा साम्यवादाकडे झुकला असल्याने व पेरिस्त्रोईका व ग्लासनोस्त या तत्त्वांचा रशियात उद्घोष व अंगीकार करण्यापूर्वीचा लेख असल्याने एक प्रकारे त्यांचे विचार अपूर्ण ठरले आहेत. विशेषेकरून रशियात त्यांच्या मताने साधलेले स्वयंनिर्णय व स्वयंव्यवस्थापन उत्पादनाचे उद्दिष्ट्य गाठले हे म्हणणे आता पूर्णतः स्वीकार्य राहिलेले नाही. कारण रशियात नुकत्याच झालेल्या परिवर्तनानंतर तेथील औद्योगिक व आर्थिक क्षेत्रात आमूलाग्र बदल घडविण्यात आल्याच्या बातम्या आहेत. जस्टिस अय्यर यांनी हेही स्पष्ट केले आहे की, रशियात एक पक्षीय सत्ता असल्याने तेथील योजना आपल्यासारख्या अनेक पक्ष असलेल्या लोकशाही पद्धतीत जशाच्या तशा उतरविणे शक्य नाही.

ब्रिटिश ट्रेड युनियन कॉंग्रेसचा एक प्रथितयश पदाधिकारी व इंग्लंडच्या पार्लमेंटमधील कामगार प्रतिनिधी मिस्टर जोहान्स सेरिगल यांनी इंडस्ट्रियल डेमॉक्रसी या पुस्तकात औद्योगिक लोकशाहीकरण या विषयासंबंधी तपशीलवार विचार मांडले आहेत. पाश्चिमात्य जगतात लोकशाही म्हणजे शासन पद्धतीचा एक प्रकार असाच अर्थ प्रचलित असल्याने सांसदीय लोकशाही पद्धतीच्या धर्तीवर औद्योगिक लोकशाही कशी आणता येईल हा त्यांच्या लिखाणाचा आधार आहे. सांसदीय लोकशाही पद्धतीने राजेशाही, हुकूमशाही या प्रवृत्तींना रोकण्यात आले तसेच कामगारांवरील मालकांच्या अनियंत्रित सत्तेला सशक्त - समजूतदार व जबाबदार कामगार संघटनांद्वारे नियंत्रित करता येईल असा त्या लिखाणातील निष्कर्ष आहे. त्यांच्या मताने सामूहिक सौदेबाजीच्या कक्षा केवळ वेतन व कामाचे तास एवढयाच पुरत्या मर्यादित न ठेवता त्या विस्तारित करून कामगारांच्या एकूण जीवनासंबंधी सर्वच बाबतीत विस्तारित करणे, उद्योगाच्या संचालक मंडळावर शृंखलाबद्ध प्रतिनिधित्व (Shop floor पासून निवडणूक करीत-करीत संपूर्ण उद्योगाचे कामगार प्रतिनिधी निवडणे), उद्योगाची आय-व्यय नीती निर्धारण समितीत कामगार प्रतिनिधी घेणे, राष्ट्राच्या आकांक्षांशी एकरूप होणारी कामगार संघटना यामध्ये आपसात आर्थिक औद्योगिक नीतीसंबंधी नित्य संवाद व्यवहार

तसेच सामाजिक प्राथमिकतांचा विचार व कामगार व देशाचे नागरिक यांच्या आवश्यकतांचा या संवादाद्वारे समन्वय अशा काही मूलभूत कल्पना उद्योगाच्या लोकशाहीकरणांच्या योजनेत त्यांनी मांडल्या आहेत. कामगार संघटनांपुढे आज संगणीकरण, अनावश्यक यांत्रिकीकरण, नित्यविकसित होणारे व्यवस्थापने तंत्र, गुंतवणुकीचे धोरण, क्रय-विक्रय धोरण इत्यादी जटिल प्रश्न. कामगार संघटनांपुढे देखील आहेत. परंतु खऱ्या अर्थाने औद्योगिक लोकशाहीकरण व्हावयाचे असेल तर त्यासाठी, जोहान्स सेरिगल यांनी स्पष्टपणे निर्देश केला आहे की, सर्वप्रथम कामगार संघटनांत लोकशाही प्रस्थापित केली पाहिजे. अनेक वर्षे एकाच व्यक्तींचे पदावर राहणे, एकाच विवक्षित गटाचे अधिपत्य संघटनेवर असणे, राष्ट्रीय नेत्यांशी संबंध ठेवून आपले पद व आपल्या गटाचे वर्चस्व अबाधित ठेवणे, राष्ट्रीय उद्दष्टिये नजरेआड करून मर्यादित लाभासाठी संघटनेच्या शक्तीचा उपयोग करणे, व्यक्तिगत महत्वाकांक्षा किंवा व्यक्तिगत श्रद्धांच्या आहारी जाऊन जनसामान्यांच्या प्रश्नांची उपेक्षा व अवहेलना करणे ह्या बाबी निकोप कामगार संघटनेलाच नव्हे तर उद्योग व राष्ट्राच्या उन्नतीत बाधा आणणाऱ्या आहेत म्हणून कामगार संघटना, उद्योगपती व शासनाचे नेते या सर्वांनी नकारात्मक दृष्टिकोन घेण्याच्या आवश्यकतेवर त्यांनी भर दिला आहे. यातून राष्ट्राच्या संपत्तीचे न्यायिक विकेंद्रीकरण व वितरण होऊन कामगारांचे शोषण या लोकतांत्रिक पद्धतीने [illegible] जाऊ शकेल, असा सेरिगल यांचा निष्कर्ष आहे.

आपल्या भारताचा विचार करता लोकशाही ही केवळ शासनपद्धती [illegible] ती एक जीवनपद्धती आहे. भिन्न मत असणे व भिन्न मतांचा आदर करणे [illegible] व्यक्त करण्याचा अधिकार असणे हे जर लोकशाहीचे मुख्य तत्त्व असेल [illegible] इतका लोकशाही प्रधान देश जगात अन्यत्र नाही. फ्रेंच राज्यक्रांतीने सर्व [illegible] समान आहे व त्यांना काही मूलभूत हक्क निर्मात्याने दिलेले आहेत - हे [illegible] भारतीय संस्कृतीत रुजलेलेच आहे. म्हणून शोषणाची कल्पना आपल्या [illegible] विकृतीच मानली आहे. परंतु गेल्या २-३ शतकात वेगाने झालेले [illegible] व त्यातून मिळणारा अफाट नफा यातूनच शोषणाची विकृती देखील निर्माण [illegible] हे देखील मान्य करावे लागेल. आजच्या तथाकथित पुरोगामी (Civilized) समाजात उद्योगपतीच नव्हे तर सरकार व अधिकारी व्यवस्थापक [illegible] अनेकविध प्रकार शोधून काढून कामगारांना त्रस्त करीत आहेत.

मागणी - पुरवठा या न्यायाने भयंकर बेकारी वाढलेल्या आपल्या देशात अत्यंत कमी रोजीवर कामगार मिळू शकतात. याचा लाभ उठवून कंत्राटदारी पद्धतीने कामगारांची वेठबिगारी सर्वत्र चालू आहे. परंतु सरकार त्यावर निर्बंध घालू इच्छित नाही. याची प्रतिक्रिया कामगार संघटनांच्या माध्यमातून प्रखरपणे उमटली आहे. देशात एकूणच नैतिक मूल्याची झपाटयाने घसरण चाललेली दिसते व प्रत्येक जण सरकार असो, उद्योगपती असो, कामगार संघटना असो एकमेकांवर बेछूट आरोप करीत आहेत. श्री. श्रीवास्तव नावाच्या एका लेखकाने सामूहिक सौदेबाजीच्या तत्त्वाला कदाचित वाटमारीचे स्वरूप येईल की काय अशी भीती व्यक्त केली आहे. बहुतेक राजकीय पक्षांवर व विशेषतः सत्तधारी पक्षावर जनतेचा विश्वास उडत चाललेला दिसतो. अशाही स्थितीत स्वस्थ औद्योगिक व कामगार नीतीचा पाठपुरावा करणाऱ्या संस्था व कामगार संघटना विद्यमान आहेत हा आशेचा किरण आहे.

उद्योगांचे लोकशाहीकरण करण्याच्या प्रक्रियेवर मांडलेल्या देशोदेशींचे प्रयोग व कल्पना आपल्या देशातही काही प्रमाणात परंतु अपवादात्मक सुरू आहेत. मात्र त्यात अनेक त्रुटीही दिसतात. व्यवस्थापनात कामगारांचा सहभाग हे तत्त्व योग्य असले तरी प्रत्यक्षात संचालक मंडळावरील कामगार प्रतिनिधीला उत्पादनासंबंधीच फक्त जबाबदार धरण्यात येते व एक प्रकारे या प्रतिनिधीला दुय्यम स्थान दिले जाऊन ही योजनाच अपयशी ठरते. सहनिर्णय व सहव्यवस्थापन ह्या तत्त्वाबाबतही असेच घडलेले दिसते. दोन्हीही तत्वात पालक व कामगार यांचा अमलबजावणीत समान जबाबदारीचा वाटा असला पाहिजे हे कोणी मान्य करीत नाहीत. संघटनेच्या मान्यतेचा घोळ आजही संपलेला नाही. यावर उपाय म्हणून संयुक्त-सौदेबाजी-प्रतिनिधी-मंडळ ही योजना भारतीय मजदूर संघाने प्रस्तुत केली परंतु त्यातही शासनाच्या धरसोड नीतीमुळे हवे तसे यश मिळालेले दिसत नाही. महाराष्ट्रात सहकारी तत्त्वावर उद्योगाचे स्वामित्व कामगारांना द्यावे ही कल्पना पुढे येत आहे परंतु ती अजूनही प्रत्यक्षात आलेली नाही. म्हणून उद्योगाचे लोकशाहीकरण याच्या पुढचे पाऊल म्हणून व शोषणमुक्त समाजाच्या निर्मितीत एक प्रयोग म्हणून श्रमिकीकरणाची कल्पना भारतीय मजदूर संघाने मांडली आहे. मी या उद्योगाचा स्वामी आहे. हा उद्योग माझा आहे, पर्यायाने ह्या उद्योगाच्या

यशाअपयशावर समाजाची, राष्ट्राची उन्नती अवलंबून आहे, ही भावना दृढमूल झाली तर ह्या देशाची उत्पादनक्षमता व सर्व समाजातील सामंजस्य निश्चित वाढेल. आपल्या देशात शोषणाचे कोणीही समर्थन करीत नाहीत. श्रीगुरुजी म्हणत असत की, 'स्वतःच्या आवश्यकतेपेक्षा जो अधिक संपत्तीचा संचय करतो तो चोर होय.' उद्योगाच्या स्वामित्वाच्या कल्पनेत उद्योगाविषयी आपलेपणा येतोच व स्वाभाविकपणे कामगार अधिक उत्पादनक्षम बनतो. शोषणाच्या विकृतीचे मूळ कामगाराकडे "मनुष्य" म्हणून न पहाणे यात आहे. त्याच्या आर्थिक गरजा या वस्तुतः दुय्यम स्थानावर जातात. मनुष्य म्हणून त्याला मानाने वागविणे हेच सर्व दृष्टीने सोयीस्कर आहे. राजाने देखील स्वतःला प्रजेचा सेवक मानून देशाच्या संपत्तीचा तो विश्वस्त असतो हीच कल्पना शुक्रनीतीत मांडल्याचे श्री. आळतेकर यांनी त्यांच्या ग्रंथात नमूद केले आहे. आपल्या भारताच्या संविधानात देखील मार्गदर्शक तत्त्वात शोषणमुक्त समाजाची कल्पना मांडली आहे. या सर्व बाबींचा विचार करता उद्योगाचे श्रमिकीकरण अर्थात उद्योगावर कामगारांचे स्वामित्त्व ही कल्पना भा.म.सं. ने मांडून एक नवी दिशा दिली आहे. आंतरराष्ट्रीय श्रमसंघटनेच्या अहवालानुसार स्वयंसेवी उद्योग भारतातच त्याच्या वैशिष्टयाने सर्वात जास्त संख्येत आहेत. यात सरकारच्या चुकीच्या आर्थिक धोरणामुळे अडचणी असतील परंतु मालक-नोकर संबंधातील शोषण-पिळवणूक यात निश्चित नसते. यामध्ये कामगारांना उद्योगात विशिष्ट समभाग-हिस्सा देणे, शासनातर्फे प्राथमिक अवस्थेत [illegible] मदत देणे, बीज भांडवल पुरविणे इत्यादी बाबी या विषयातील अभ्यासकांनी मांडल्या आहेत. त्याचा तपशील हा एक स्वतंत्र विषय होईल.

हे उद्दिष्ट्य साध्य होणे नजीक भविष्यात कठीण दिसते, [illegible] उद्योगात हा प्रयोग करून पाहणे देशहिताचे ठरेल. धोरणाकडे [illegible] वळणे हे आहे. अब्राहम लिंकनने म्हटल्याप्रमाणे "Under God [illegible] Government of the People, by the people & [illegible] people shall ever prosper. जनतेच्या सामूहिक, सार्वभौम [illegible] परमेश्वरी शक्तीचा लिंकनला विसर पडला नव्हता हाच लोकनीतीचा [illegible] या देशाची संपूर्ण संपत्ती ईश्वराधीन ही भावना दृढ झाल्यास शोषणमुक्त [illegible] कल्पना श्रमिकीकरणाद्वारे साकार होऊ शकेल. यातील तपशील तज्ज्ञांकडे सोपवणे हेच श्रेयस्कर ठरेल.

स्वदेशी - आवश्यकता व शक्यता

आपला देश सध्या तीन ज्वलंत प्रश्नांनी ढवळून निघत आहे. पहिला प्रश्न आहे खरी धर्म निरपेक्षता व बेगडी धर्मनिरपेक्षता, दुसरा आहे श्रीनगरमध्ये भारताचा राष्ट्रध्वज फडकविण्याचा व तिसरा प्रश्न देशाला आर्थिकदृष्ट्या स्वतंत्र ठेवण्याचा. या प्रश्नांनी देशांत विचारमंथन चालू असतांनाच रा स्व. संघ व त्याच्या प्रखर देशभक्तीच्या मुशीत घडलेल्या संघटनांनी वरील तीनही प्रश्नांचा मूलभूत विचार करून त्यांची चोख उत्तरे देशासमोर ठेवून तितकेच धडाडीचे कार्यक्रम आखले. पहिल्या प्रश्नाला उत्तर दिले श्रीरामजन्मभूमी मुक्ती संग्रामाने, दुसऱ्याचे उत्तर दिले कन्याकुमारी ते श्रीनगर एकता यात्रेतून व तिसऱ्या प्रश्नाचे उत्तर आहे स्वदेशी.

एक प्रकारे या आधुनिक वामनावताराने एकेका पावलागणिक राष्ट्रीय अस्मितेची ग्वाही, हिंदुस्थानच्या सार्वभौमत्वाची प्रत्येक देशवासियाला अनुभूती व देश सुराज्याच्या मार्गावर चालू लागण्याची हमी देशाला मिळून संपूर्ण देश पुनश्च स्वाभिमानाने उभा राहील.

पहिल्या दोन प्रश्नांची आता तड लागेलच. स्वदेशी विचार मात्र देशाला दीर्घ काळ चालवावा लागेल. स्वदेशीचे व्रत घ्यावे लागेल.

स्वदेशीच्या आवश्यकतेचा विचार थोडया इतिहासाच्या परिशीलनाने फार उब्बोधक दिसेल. स्वदेशीची व्याप्ती केवळ स्वदेशी वस्तू पुरतीच मर्यादित नाही. याची उत्पत्ती स्वदेश भक्तीतून असल्याने यांत स्वदेशी वस्तू, स्वदेशी भाषा,स्वदेशी वेशभूषा, स्वदेशी आचार-विचार-संस्कृती अर्थात जे जे मौलिक म्हणून स्वदेशाचे आहे त्या सर्वांचा स्वदेशीत समावेश आहे-असलाच पाहिजे. म्हणून ज्या काळांत व ज्या परिस्थितीत लोकमान्य टिळक, महात्मा गांधी, स्वा. सावरकर, पूजनीय डॉक्टर हेडगेवार आदी अनेक देशभक्तांनी स्वदेशीचा मंत्र देशासमोर ठेवला व त्यासाठी अनेकविध कार्यक्रम राबविले, त्या परिस्थितीचा इतिहास पाहावा लागेल.

चतुर व्यापारी

इंग्रज या देशांत इस्ट इंडिया कंपनीच्या माध्यमातून व्यापारानिमित्त आले. इंग्रज मनुष्य हा केवळ चतुर व्यापारीच नव्हता तर धूर्त राजकारणीही होता.

येथील अनेक राजांकडून तऱ्हेतऱ्हेच्या सवलती मिळवत त्यांच्या येथील मिळकतीच्या संरक्षणासाठी सेना उभारण्याची सवलतही त्यांनी मिळवून घेतली. व होता होता कुटिल राजनीतीच्या आधारावर इथे इंग्रजी साम्राज्य प्रस्थापित केले. इतिहासाची पाने चाळतां असे दिसते की इंग्रजांनी इ.इ.कं. नी बरोबर सर्वप्रकारचे तज्ज्ञही आणले होते. राजकारणतज्ज्ञ, भाषातज्ज्ञ, समाजशास्त्रज्ज्ञ, शिक्षणतज्ज्ञ रणनीतीतज्ज्ञ यांचा कंपनीत निरनिराळी पदे देऊन समावेश केलेला दिसतो. या सर्वांनी आमच्या देशाची समाजव्यवस्था, राज्यव्यवस्था, शिक्षण पद्धती, धर्मनिष्ठा; उद्योगव्यवस्था इ. चा सखोल अभ्यास केला. हा देश शेकडो वर्षांच्या आक्रमणाला तोंड देत असूनही एक संघ राहतो, संस्कृती टिकवून ठेवतो. याचे मर्म त्यांनी शोधले व हा देश पादाक्रांत कसा करता येईल याचा अभ्यास केला. देशाच्या असंघटितपणाचा फायदा घेऊन सर्व प्रथम इंग्रजांनी इथे राज्य स्थापन केले व हे साम्राज्य कायम कसे टिकेल, हिंदुस्थान नेहमीकरतां त्यांचा गुलाम कसा राहील याच्या योजना अत्यंत कुशलतेनी आखल्या. इ. इं. कंपनीबरोबर इथे ३०-४० वर्षे राहून हिंदुस्थानच्या परिस्थितीचा अभ्यास करून ब्रिटिश पार्लमेंटला जे बुद्ध त्यांनी सादर केले त्या आधारावर इंग्रजांनी या योजना आखल्या. त्यातल्या फक्त दोन योजनांचा विचार फार महत्वाचा आहे. पहिली योजना हिंदुस्थानची शिक्षणपद्धती मोडून काढून त्या जागी ख्रिश्चन धर्माला अनुकूल व इंग्रजी राज्याला सहाय्यभूत ठरणारी शिक्षण पद्धती इथे अमलांत आणणे व दुसरी योजना येथील व्यवस्था उद्ध्वस्त करणे. या योजनांचा परिणाम किती भयानक झाला हा इतिहास [illegible] मेकॉलेनी आजची शिक्षण पद्धती रुजवली. मेकॉलेनी सन १८३५ मध्ये [illegible] वडिलांना व बहिणीला लिहिलली पत्रे आता प्रकाशित झालेली [illegible] त्यातून या शिक्षण पद्धतिचा त्याला अपेक्षित परिणाम स्पष्ट मांडला [illegible] हे स्वप्न होते की या शिक्षण पद्धतीद्वारे हिंदुस्थानाचा मनुष्य देहानी हिंदू [illegible] पण मनाने पूर्णपणे ख्रिस्ती म्हणजे इंग्रजी झालेला असेल. त्यांच्याच शब्दात [illegible]

- "The effect of this education on the Hindus is pro[illegible] No Hindu who has received English Education [illegible] remain sincerely attatched to his religion, some con[illegible] to profess it as a matter of policy. It is my firm belief [illegible] plans of education are followed up there will not be [illegible] single idolator among the respectable classes in Ben[illegible] thirty years hence.

विलियम कॅरी व विलियम एच. मिल व जॉन मुईर यांनी या शिक्षण पद्धतीचा हिरिरीने प्रसार केला हे नमूद आहे. १९०८ मध्ये आनंद कुमारस्वामी यांनी इंग्रजी शिक्षित माणसाचे फारच मजेदार वर्णन केले आहे. तो म्हणतो की विद्यापीठात शिक्षण घेतलेल्या एखाद्याला सांगा की महाभारत,रामायण या ग्रंथांत भारतीय संस्कृतीचे दर्शन घडते तर तो लगेच शेक्सपियरची नाटके तुम्हाला सांगेल, आपल्या दर्शन शास्त्रांविषयी त्यांच्याशी बोलले तर तो स्वतःला पूर्ण नास्तिक म्हणवेल, येथील संगीत शास्त्राचे त्याला सांगा तर तात्काळ तो ग्रामोफोन सांगेल, आमचा वेष, आभूषणे, इ. विषयी म्हणाल तर तो तुम्हाला जंगली म्हणेल. कलाविषयी सांगाल तर तो आश्चर्य व्यक्त करेल व इंग्रजीतील पांच-दहा वाक्यांचे मातृ भाषेत रूपांतर करा म्हणाल तर तो पूर्णपणे असमर्थता दाखवेल. एकंदरीत इथला माणूस याच देशांत परकीय दिसेल.

इंग्रजी शिक्षणाचा किती भयानक परिणाम या समाजावर झाला हे आम्ही नित्य अनुभवतो आहोतच. इथले लोकाग्रणी, साहित्यिकदेखील इंग्रजी भाषेला इतके भाळले होते की, इंग्रजी भाषेला वाघिणीचे दूध म्हणण्यापर्यंत त्यांची मजल गेली. हिंदूचे जे जे असेल ते ते त्याज्य हेच इथले शिक्षित मानू लागले.

ही गुलामी नष्ट व्हावी म्हणून

ही इंग्रजांची व इंग्रजीची गुलामी नष्ट करून देश स्वाभिमानाने उभा करण्यासाठीच वरील थोर नेत्यांनी स्वदेशीचा महान मंत्र आम्हाला दिला. इंग्रजीला वाघिणीचे दूध म्हणणाऱ्यांना ल. रा. पांगारकरांनी, गुलामी धुडकावून लावण्यासाठी गर्जना केली की छत्रपती शिवाजी महाराज, गुरुगोविंद सिंहजी, वासुदेव बळवंत या देशभक्तांनी जी पराक्रमाची शर्थ केली ती काय देशी गाईच्या बकरीचे दूध पिऊन केली काय? क्रिकेट विदेशी व त्याज्य खेळ असूनही देवधरांनी इंग्रजीच्या खेळावर प्रभुत्व मिळवून त्यांना पराजित केले म्हणून त्यांचे अभिनंदन केले होते. विदेशी कापडाची होळी लो. टिळकांच्या साक्षीने पेटवली. महात्मागांधींनी स्वदेशी वेष स्वतः परिधान करून इंग्लंडला गेले. गुरुदेवांनी त्यांच्या अलौकिक योजनांनी देशवासीयांच्या हृदयांत देशभक्ती, स्वदेशी, वेष, भाषा इ. जागृती केली. श्रीगुरूजी म्हणत देशांतल्या सर्व भाषा राष्ट्रभाषा आहेत. हिंदी ही आपली संपर्क भाषा आहे. असा संपूर्ण राष्ट्राच्या एकात्मतेचा विचार दृढ केला.

ज्या शिक्षण पद्धतीमुळे आम्ही कायमचे गुलाम होण्याचे संकट देशावर आले ती पद्धती बदलणे व त्यातून खरे जागरण करणे आवश्यक आहे. स्वदेशीचा

विसर म्हणजे देशभक्तीची क्षीणता. हा मूलभूत विचार समजून घेतला तर स्वदेशीची आवश्यकता काय हा प्रश्न उरणारच नाही.

देशी उद्योगाविषयी

आतां इंग्रजांच्या दुसऱ्या योजनेचा म्हणजे देशी उद्योगव्यवस्थेचा त्यांनी कसा विध्वंस केला याचा इतिहास पहा.

